दैनिक
जनप्रभात
सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज
मुख्य संपादक :- राहुल गजरे
कार्यकारी संपादक :- अवधूत शेंद्रे
*(आष्टी) वर्धा *गुरुवार, ३० एप्रिल २०२६ *वर्ष ४ थे *अंक १०८ *पृष्ठ ६ *मुल्य ५.०० RNI No.: MAHAR/2022/82242

वीज चोरी प्रकरणी गुन्हा दाखल

वर्धा. लघुदाब विद्युत वाहिनीवर हूक टाकून वीज चोरी करीत असलेल्या महादेवपुरा येथील राजेश परतेकी यांच्यावर शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. महावितरणच्या शहर उपविभागांतर्गत शाखा प्रमुख अमोल पिंगळे हे १७ एप्रिल रोजी वीज चोरी संदर्भात शोध मोहीम राबवित असताना महादेवपुरा येथील राजेश परतेकी यांच्या घरातील वीज पुरवठ्याची तपासणी केली. महावितरणचे कायमस्वरुपी वीज कनेशन आढळून आले नाही. मात्र, घराबाहेरील लघुदाब विद्युत वाहिनीवर हूक टाकून ते वीज चोरी करीत असल्याचे निदर्शनास आले. हा प्रकार वीज चोरीचा असल्याने संबंधितावर गुन्हा दाखल करण्यात आला. विशेष म्हणजे गुन्हा दाखल करण्यापूर्वी राजेश परतेकी यांनी १३ हजार ६७० रुपयांची वीज चोरी केल्याचा ठपका ठेवून त्यांच्यावर २ हजारांचा दंड ठोठावण्यात आला होता.

वर्धा जिल्ह्यात ६७ रुग्णांना सुमारे ६३.४० लाखांची मदत

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून आरोग्यसेवेला गती

वर्धा : शासनाच्या आरोग्यविषयक विविध योजनांमधून मदत न मिळालेल्या पात्र व गरजू रुग्णांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी 'आधार' ठरत आहे. वर्धा जिल्ह्यात आर्थिक वर्षात ६७ रुग्णांना सुमारे ६३ लाख ४० हजार रुपयांची वैद्यकीय आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून जिल्हा कक्षाची स्थापना, पेपरलेस अर्ज प्रक्रिया, तातडीने अर्जाचा निपटारा करणे आदी सकारात्मक बदल करण्यात आले. त्यासोबतच सामंजस्य करार, क्राउड फंडिंग आदींच्या माध्यमातून समाजातील मदत करणारे रूग्णालय, धर्मादाय रुग्णालय, संस्था, दाते आदींचे सहकार्य मिळत आहे.

मुख्यमंत्री सहायता निधीच्या कार्यपद्धतीत केलेल्या सुधारणा आणि मदतीचे विविध मार्ग उपलब्ध करून दिल्याने पारदर्शकता वाढून मदत वितरणाचा वेग लक्षणीयरीत्या वाढला आहे. परिणामी, अधिकाधिक पात्र रुग्णांना वेळेत आर्थिक सहाय्य मिळत आहे.

२० गंभीर आजारासाठी मदत

कॉक्लियर इम्प्लांट (वय वर्ष २ ते ६), हृदय, यकृत, किडनी, फुफ्फुस, बोन मॅरो, हाताचे, गुडघ्याचे प्रत्यारोपण, हिप रिप्लेसमेंट, कर्करोग शस्त्रक्रिया, रस्ते अपघात, लहान बालकांची शस्त्रक्रिया, मेंदूचे आजार, हृदयरोग, डायालिसिस, कर्करोग (केमोथेरपी / रेडिएशन), अस्थिबंधन, नवजात शिशुंचे आजार, बर्न (भाजलेले) रुग्ण, विद्युत अपघात रुग्ण या अशा एकूण २० गंभीर आजारांसाठी आर्थिक सहाय्य दिले जाते.

आर्थिक वर्षातील मदत

१ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत राज्यातील तब्बल ४० हजार ७७६ रुग्णांना ३३३ कोटी ६ लाख ८१ हजार ५०० रुपयांची वैद्यकीय मदत देण्यात आली आहे. तर, याच कालावधीत वर्धा जिल्ह्यातील ६७ रुग्णांना सुमारे ६३ लाख ४० हजार रुपयांची आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारातून वर्धा जिल्ह्यातील ६७ पात्र व गरजू रुग्णांना ६३ लाख ४० हजार रुपयांची वैद्यकीय मदत करण्यात आली आहे. ही योजना अनेक कुटुंबांसाठी मोठा आधार ठरत आहे. जलद, पारदर्शक आणि संवेदनशील कार्यपद्धतीमुळे पात्र रुग्णांना वेळेत उपचारासाठी आर्थिक सहाय्य मिळत आहे. गरजूंनी १८०० १२३ २२११ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षाचे कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे.

सामंजस्य करारातून मदतीचा मार्ग मोकळा

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष, बीपीसीएल फाऊंडेशन व टाटा मेमोरियल सेंटर यांच्यात बालकांच्या कर्करोग उपचारासाठी नुकताच सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारामुळे सामाजिक दायित्व (सीएसआर) अंतर्गत उपचारांसाठी विशेष निधी उपलब्ध होणार आहे. आर्थिक अडचणी कमी होऊन गरजू बालकांना गुणवत्तापूर्ण कर्करोग उपचार सुलभ होणार आहेत.

राजकारणात 'कार्यकर्ते' गायब, 'चाटूकारांची' चांदी;

लोकप्रतिनिधींच्या भोवती 'शून्य जनाधार' असलेल्यांची फौज! ?

प्रतिनिधी/ गौरव सोमकुवर

कारंजा(घा.) : राजकारणात पूर्वी 'रक्ताचं पाणी' करणारा कार्यकर्ता असायचा, पण आता त्याची जागा 'साहेबांच्या पाण्याचे' पेले उचलणाऱ्या चाटूकारांनी घेतली आहे. सध्या प्रत्येक राजकीय पक्षात निष्ठवंत कार्यकर्त्यांची किंमत एखाद्या 'जुनाट फर्निचर'सारखी झाली असून, वार्डात ज्याला कुणी ओळखत नाही, अशा 'बॅनरबहाद्दरांची' चलती वाढल्याचे चित्र दिसत आहे.

? ?ज्या कार्यकर्त्यांला स्वतःच्या वार्डात लोक विचारत नाहीत, ज्याला साधी ग्रामपंचायतीची पाच मतं फिरवता येत नाहीत, अशांची फौज सध्या लोकप्रतिनिधींच्या निवासस्थानी आणि कार्यालयात सर्वात जास्त पाहायला मिळते. 'साहेब, मी म्हटलं तर अख्खा वार्ड आपल्या मागे फिरेल,' असे आश्वासन देऊन साहेबांच्या कानात फुंकर मारण्याचे तंत्र या फौजेने आत्मसात केले आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, साहेबही या 'हवेतील' दाव्यांवर खुश होऊन त्यांनाच जवळ करत आहेत.

या नवीन पिढीच्या कार्यकर्त्यांकडे 'जनाधार' असो वा नसो, पण 'स्मार्टफोन' मात्र नक्कीच असतो. 'साहेब म्हणजे विकासाचा महामेरू' अशा आशयाच्या पोस्ट फेसबुक आणि व्हॉट्सपवर टाकून आपणच पक्षाचे तारणहार आहोत, असा बनाव हे कार्यकर्ते रचत आहेत. प्रत्यक्षात जेव्हा ग्राउंडवर जाण्याची वेळ येते, तेव्हा हेच 'चाटूकार' वैयक्तिक कामांची यादी घेऊन साहेबांच्या केबिनमध्ये बसलेले दिसतात. लोकप्रतिनिधींनाही अशा पोकळ कार्यकर्त्यांची सवय झाली असून, खरी कामे करणाऱ्या कार्यकर्त्यांला मात्र 'तुझं नंतर बघू' म्हणून बाजूला सारलं जात आहे.



नेत्यांच्या भोवती 'चाटूकारांचे' कडे

खरा कार्यकर्ता प्रश्नांची मांडणी करतो, म्हणून तो नेत्यांना 'त्रासदायक' वाटतो. याउलट, चाटूकार फक्त 'हो ला हो' करतो आणि साहेबांच्या प्रत्येक विनोदावर जोरात हसतो, त्यामुळे त्यालाच 'खास माणूस' म्हणून दर्जा मिळतो. आपली वैयक्तिक कामे काढून घेण्यासाठी पक्षाच्या हिताचा बळी देणाऱ्या या फौजेमुळे सध्या निष्ठावंत कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड नाराजी पसरली आहे.

थोडक्यात सांगायचे तर:

आजकाल राजकारणात निवडणुकीचं तिकीट मिळवण्यासाठी लोकांमध्ये जाण्यापेक्षा, साहेबांच्या गाडीचा दरवाजा उघडण्याचं 'कौशल्य' जास्त उपयोगी पडत आहे. जर तुमच्याकडे जनाधार नसेल तरी चालेल, पण तुमच्याकडे 'साहेबांची स्तुती' करण्याची ताकद असेल, तर राजकारणात तुमचं भविष्य 'उज्ज्वल' आहे!

३ मे रोजी होणाऱ्या नीट परीक्षेसाठी मार्गदर्शक सूचना

वर्धा, दि. २९ (जिमाका) : जिल्ह्यातील विविध परीक्षा केंद्रावर दि. ३ मे रोजी दुपारी २ ते ५ या वेळेत नीट परीक्षा घेण्यात येणार आहे. या परीक्षेसाठी बसणाऱ्या परीक्षार्थी व पालकांनी मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

परीक्षा केंद्रावर प्रवेश सकाळी ११ वाजल्यापासून सुरू होईल. दुपारी १.३० नंतर कोणत्याही उमेदवारास प्रवेश दिला जाणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी वेळेआधी केंद्रावर पोहोचने आवश्यक आहे. उमेदवारांनी फोटो लावलेले प्रवेशपत्र तसेच एक वैध मूळ फोटो ओळखपत्र सोबत बाळगणे आवश्यक आहे.

प्रवेशद्वारावर काटेकोर तपासणी व बायोमेट्रिक पडताळणी करण्यात येईल. पालक किंवा संरक्षकांना परीक्षा केंद्रात प्रवेश दिला जाणार नाही. मोबाईल फोन, इलेक्ट्रॉनिक साधने, स्मार्ट घड्याळे, अभ्यास साहित्य, कागदपत्रे, कॅल्क्युलेटर किंवा इतर अनधिकृत वस्तू बाळगण्यास मनाई आहे. तसेच, दागिने, घड्याळे, धातूच्या वस्तू परिधान करू नयेत. पट्टे (बेल्ट), टोपी किंवा नियमबाह्य ॲक्सेसरीज टाळाव्यात. बंदी असलेल्या वस्तू आढळल्यास परीक्षा नियमांनुसार कडक कारवाई केली जाईल.

परीक्षा केंद्रावर सुरक्षा, वैद्यकीय मदत, पिण्याचे पाणी व्यवस्था करण्यात आली आहे. दिव्यांग उमेदवारांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. उष्णतेच्या पार्श्वभूमीवर उमेदवारांनी पुरेसे पाणी प्यावे व हलका आहार घ्यावा. उन्हात जास्त वेळ थांबणे टाळावे. उष्णतेमुळे होणारी गैरसोय टाळण्यासाठी वेळेआधी केंद्रावर पोहोचावे. नियमांनुसार पारदर्शक पाण्याची बाटली नेण्यास परवानगी आहे.

पालकांनी परीक्षा केंद्राबाहेर गर्दी करू नये. उमेदवार वेळेत केंद्रावर पोहोचतील याची खात्री करावी. सर्व उमेदवारांनी व पालकांनी परीक्षा सुरळीत आणि पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



वर्धा इज रीडिंग उपक्रमाची सुरुवात

एक वर्ष चालणारा हा उपक्रम वर्ध्यातील सुमारे १००० शाळा आणि अंगणवाडी केंद्रांपर्यंत पोहोचणार असून बहुराज्य स्तरावरील आनंददायी वाचन उपक्रमाचा एक भाग आहे.

वर्धा: वर्धा जिल्हा प्रशासन आणि बालपुस्तक प्रकाशन संस्था प्रथम बुक्स यांच्या सहकार्याने वर्धा इज रीडिंग या जिल्हास्तरीय वाचन प्रोत्साहन उपक्रमाची सुरूवात नायरा एनर्जीने केली आहे.या उपक्रमाचा उद्देश सुमारे दोन लाख मुलांमध्ये मूलभूत साक्षरता बळकट करणे हा आहे. या उपक्रमाचे औपचारिक उद्घाटन वर्धा जिल्हा परिषद कार्यालयातील सिंधुताई सपकाळ सभागृह येथे आयसीडीएस आणि एसएसए यांच्या सहकार्याने करण्यात आले.या कार्यक्रमाला वर्धा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. पराग सोमण,आयसीडीएस च्या डेप्युटी सीईओ श्रीमती मनिषा कुरसुंगे, वर्ध्याच्या शिक्षण अधिकारी श्रीमती सीमा पाटील तसेच वर्धा जिल्हा प्रशासन, नायरा एनर्जी आणि प्रथम बुक्सचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. या उपक्रमाला महाराष्ट्र शासनाचे राज्यमंत्री आणि वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज राजेश भोयर आणि आष्टी ब्लॉक,वर्धा येथील आमदार श्री.सुमित वानखेडे यांचेही पाठबळ आणि प्रोत्साहन लाभले असून वर्ध्यातील मुलांमध्ये वाचन संस्कृती रुजवण्यास ते सहाय्यक ठरणार आहे.या वर्षभर चालणाऱ्या कार्यक्रमाचे उद्दिष्ट मुलांमध्ये वाचन कौशल्ये विकसित करणे आहे. त्यासाठी शाळा आणि अंगणवाडी शिक्षणात वाचन हे नियमित आणि आनंददायी बनवण्यावर भर दिला जातो. यासाठी मराठी आणि इंग्रजी भाषेतील आकर्षक आणि छान छान चित्रांनी भरलेली पुस्तके, वर्गखोल्या आणि अंगणवाडी ग्रंथालये, तसेच प्रशिक्षित शिक्षक आणि अंगणवाडी सेविकांद्वारे साध्या सोप्या, सुलभ कथांवर आधारित अध्यापन पद्धती उपलब्ध करून दिल्या जातील.हा उपक्रम वर्धा जिल्ह्यातील ४०२ सरकारी शाळा आणि ६१२ अंगणवाडी केंद्रांमध्ये राबवला जाणार असून लहान वयापासूनच मुलांमध्ये शब्दसंपत्ती, आकलन क्षमता आणि आत्मविश्वास वाढवण्यास मदत करेल.या उपक्रमाबाबत बोलताना, प्रसाद पनिकर म्हणाले,'मूलभूत साक्षरता केवळ साहित्य उपलब्ध करून दिल्यामुळे निर्माण होत नाही. जेव्हा मुलांना नियमितपणे पुस्तके वाचण्याची संधी मिळते आणि त्यातून त्यांच्या कुतूहलाला आणि आनंदाला चालना मिळते तेव्हाच ती विकसित होते. 'वर्धा इज रीडिंग' या उपक्रमाद्वारे आम्ही वर्गखोल्या आणि अंगणवाड्यांमध्ये पुस्तके उपलब्ध करून देणे, शिक्षकांना उपयुक्त साधने पुरविणे आणि वाचनाला दैनंदिन सवय म्हणून प्रोत्साहित करणे यांसह एका सुसूत्र दृष्टिकोनाला पाठबळ देत आहोत.

सेवाग्राम व तेलंगाना एक्सप्रेसला सेवाग्राम येथे थांबा दया



खासदार अमर काळे यांची रेल्वे मंत्र्यांकडे मागणी.

सेवाग्राम येथे महात्मा गांधी यांचे वास्तव्य व स्वतंत्रता आंदोलनाच्या कितीतरी योजना या सेवाग्राम आश्रमातून निश्चित झालेल्या आहेत. एवढेच नाही तर स्वतंत्रता आंदोलने या आश्रमातूनच लढल्या गेली आहेत. या आश्रमात गांधीजींना भेटण्याकरीता अनेक बडे नेते जसे पं. नेहरु, सरदार पटेल, मौलाना आझाद, डॉ. राजेंद्र प्रसाद इतकेच नाही तर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सुध्दा यायचे. यामुळे सेवाग्रामला जागतिक पातळीवर एक अनन्यसाधारण महत्व आहे. स्वातंत्र्यानंतर सुध्दा सेवाग्राम येथे पर्यटकांना येण्यास सोय व्हावी म्हणून सेवाग्राम रेल्वे स्टेशनची निर्मिती करण्यात आली. त्यामुळे देशातीलच नव्हे तर जगातील पर्यटक गांधीजीच्या स्मृती जोपासण्यासाठी सेवाग्रामला येतात. याचीच एक आठवण म्हणून रेल्वे विभागाने एक गाडी सुरु केली ती नागपूर-दादर-नागपूर ही एक्सप्रेस गाडी हीलाच 'सेवाग्राम' नावाने नाव देण्यात आले. दु:ख एवढेच आहे. ज्या जागतिक पर्यटन स्थळ व गांधीजीच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या भूमिच्या नावावर जी सेवाग्राम एक्सप्रेस नावाने गाडी सुरु करण्यात आली तिला सेवाग्राम स्टेशनवरच थांबा नसणे हा तर फारच दुर्भाग्यपुर्ण आहे. एवढेच नाही तर दक्षिणेकडे जाणाऱ्या सर्वच गाडया सेवाग्राम स्टेशनवरुनच जावे लागते त्या नागपूर मुंबईकडून येणाऱ्या प्रत्येक प्रवाशाला दक्षिणेकडे जाण्यासाठी या स्टेशनवरच उतरावे लागते त्यामुळे सेवाग्राम स्टेशनवर सेवाग्राम एक्सप्रेसला थांबा देण्यात यावा या मागणीसाठी खासदार अमर काळे यांनी रेल्वेमंत्र्यांना पत्र लिहून मागणी केली आहे. यासोबतच त्यांनी तेलंगना एक्सप्रेस १२७२४ला सेवाग्राम स्टेशनवर थांबा देण्याची सुध्दा मागणी केली आहे. सेवाग्राम येथील हॉस्पीटल मध्ये येणारे रुग्ण कॉलेज मध्ये शिकणारे विद्यार्थी व सेवाग्राम स्टेशनवरुन चंद्रपूर येथे सकाळपासून दुपार पर्यंत जाणाकरीता एकही गाडी नसल्याने तेलंगाना एक्सप्रेसला सेवाग्राम येथे थांबा देणेबाबत त्यांनी रेल्वे मंत्र्यांना पत्र लिहून विनंती केली आहे.

यासोबतच त्यांनी बडनेरा ते नरखेड धावणारी मेमू ट्रेन नागपूर पर्यंत नेण्याची मागणी केली आहे. नरखेड, वरुड, मोर्शी, काटोल हा भाग संत्रा हब म्हणून ओळखला जातो येथील संत्रा बाहेर देशात पाठविला जातो. त्यामुळे येथे व्यापाऱ्यांची सतत ये-जा असते. इतकेच नाही तर ही गाडी नागपूर पर्यंत गेल्यास नागपूर वरुन नरखेड वरुड मोर्शी काटोल या भागात येणाऱ्या व याच भागातून बडनेरा येथे मुंबईला जाण्यासाठी बडनेरा पर्यंत जाणे येणे करीता एकदम सोयीची गाडी असल्याने बडनेरा नरखेड ही मेमू गाडी नागपूर पर्यंत नेण्याची सुध्दा खासदार अमर काळे यांनी रेल्वे मंत्र्यांकडे केली आहे.

कोविड-१९ पासून रेल्वे विभागाने जे विविध निर्बंध रेल्वे गाडयांचे थांबे व गाडया सुरु करण्यावर लादले होते. त्या पुर्ववत करण्याबाबत खासदार अमर काळे यांचा रेल्वे विभागाकडे सतत पाठपुरावा सुरु असून हा पाठपुरावा पुर्ण थांबे रेल्वे गाडया पुर्ववत होई पर्यंत सुरु राहील असेही मत खासदार अमर काळे यांनी व्यक्त केले.

अल्पवेळेत सहा ग्रामपंचायतीच्या पोटनिवडणुकींचा निकाल

- करंजी (काजी), नांदोरा (डफरे), दहेगाव येथे सरपंचपदाची पोट निवडणूक

वर्धा: जिल्ह्यातील सहा ग्रामपंचायतच्या पोटनिवडणुकीकरता मतमोजणी प्रक्रिया शांततेत पार पडली. तीन ग्रामपंचायतमध्ये सरपंच पदाकरिता पोटनिवडणूक होती. तहसील कार्यालय मध्ये पार पडलेल्या मतमोजणीच्या निकालाकडे सर्वांचे लक्ष लागले होते. यावेळी अल्प वेळेतच मतमोजणीची प्रक्रिया पार पडली. करंजी (काजी), नांदोरा (डफरे), दहेगाव येथे सरपंचपदाची पोट निवडणूक होती तर अन्य ठिकाणी सदस्य पदाकरीता पोट निवडणूक झाली. निकालानंतर विजयी उमेदवारांसह कार्यकर्त्यांनी जल्लोष केला. वर्धा तालुक्यातील करंजी (काजी) येथे सरपंच आणि एका सदस्य पदाकरिता पोटनिवडणूक घेण्यात आली. येथे सरपंचपदासाठी हर्ष लोकेश वलके विजयी झाल्या. त्यांना ४८१ मते मिळाली. लीना विश्वास सडमाके यांना ४६५ मते मिळाली. १५ जणांनी नोटा मत दिले. सदस्य पदासाठी दोन उमेदवार होते. यामध्ये प्रीती विशाल सडमाके या १३७ मते मिळवत विजयी झाल्या. वर्ध्याच्या तहसील कार्यालयात मतमोजणी प्रक्रिया पार पडली. तहसीलदार संदीप पुंडेकर यांच्या उपस्थितीत ही प्रक्रिया पार पडली. यावेळी पोलिसांचा बंदोबस्त ठेवण्यात आला होता. निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर कार्यकर्त्यांनी गुलाल उधळून विजयाचा जल्लोष केला. करंजी (काजी) येथे काँग्रेस उमेदवाराचा विजय झाल्याचे सांगण्यात आले.

संपादकीय

उष्माघाताचे संकट!



यंदाचा उन्हाळा केवळ घामाच्या धारा काढणारा नसून अंगाची लाहीलाही करणारा आणि जीवघेणा ठरू लागला आहे. महाराष्ट्रासह संपूर्ण देश सध्या एका भीषण नैसर्गिक संकटाचा सामना करत असून, तापमानाने चाळिशी केव्हाच ओलांडून आता ४७ अंशांच्या दिशेने कूच केली आहे.

महाराष्ट्रातच नव्हे तर देशातील काही भागांतील नागरिकांना एका भीषण नैसर्गिक संकटाचा सामना करावा लागत आहे. अनेक राज्यांमध्ये तापमानाचा उच्चांक पाहायला मिळत असून, नागरिक निसर्गाच्या अत्यंत दाहक आणि भीषण संकटाशी सामना करत आहेत. वैशाख वणव्याची दाहकता एप्रिलमध्येच जाणवू लागली असून, ४५ अंशांच्या पार गेलेल्या तापमानामुळे आभाळातून पावसाऐवजी आगीच्या ज्वालाच खाली येत आहेत की काय, अशी भीषण स्थिती निर्माण झाली आहे.

उत्तर प्रदेशातील बांदा येथे देशातील सर्वाधिक ४७.६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली असून, उन्हाच्या तडाख्याने सीमा ओलांडली आहे. राजस्थान, पंजाब, हरियाणा, दिल्ली आणि मध्य प्रदेशासह पूर्व भारतातील पश्चिम बंगाल, बिहार आणि झारखंडमध्येही सूर्याचा प्रकोप जाणवत आहे. दक्षिण भारतात तेलंगणा, कर्नाटक, तामिळनाडू आणि आंध्र प्रदेशात उष्णतेच्या लाटेने धोक्याची पातळी ओलांडली. ओडिशामध्येही उष्णतेने उच्चांक गाठला आहे. दुसऱ्या बाजूला जम्मू-काश्मीरसारख्या थंड प्रदेशातही तापमानाचा पारा चढलेला दिसत असून, ही स्थिती काळजीचा ठोका चुकवणारी आहे. राज्यात नेहमीप्रमाणे विदर्भातील अकोला, चंद्रपूर आणि नागपूर या जिल्ह्यांत उष्णतेने कहर आहे. विशेषतः अकोल्याचा पारा ४६.९ अंशांवर पोहोचल्याने हे शहर उष्ण शहरांच्या यादीत स्थान वरच्या स्थानी आहे. केवळ विदर्भच नव्हे, तर मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातही उष्णतेच्या लाटेने नागरिकांची लाहीलाही होत आहे. उष्णतेच्या लाटांचा भूगोल आता वेगाने बदलत असून, उत्तर भारताकडून ही आग मध्य आणि दक्षिण भारताकडे सरकली आहे. अगदी हिमालयाच्या कुशीतील जम्मू-काश्मीरही या आगीतून सुटलेले नाही. ही उष्णता आता केवळ घामाच्या धारा काढणारी उरली नसून ती थेट जीव घेण्यावर टपली आहे. परभणीपासून हिंगोलीपर्यंत आणि नगरपासून नागपूरपर्यंत सात-आठ जणांचा उष्माघातामुळे मृत्यू झाला आहे. शेतात राबणारा शेतकरी आणि कामासाठी पायपीट करणारा कष्टकरी आज या निसर्गनिर्मित संकटाचा बळी पडत आहे, हे विदारक सत्य आहे. पर्यावरण शास्त्रज्ञांच्या मते, ही दाहकता केवळ ऋतुचक्राचा भाग नसून 'हवामान बदलाचा' एक धोक्याचा इशारा आहे. वाढते सिमेंटचे जंगल आणि बेसुमार वृक्षतोडीमुळे निसर्गाचा समतोल ढासळला असून, जागतिक तापमान वाढीमुळे उष्णतेच्या लाटांची वारंवारता आणि तीव्रता दोन्ही आता नियंत्रणाबाहेर गेल्या आहेत. पूर्वी मे महिन्यात जाणवणारे उन्हाचे चटके आता मार्च-एप्रिलमध्येच अंगाची लाहीलाही करत आहेत. मार्च महिन्यातच तापमानाचा पारा ४० अंशांच्या पार जाणे, ही धोक्याची घंटा मानली जात होती. दिल्ली, उत्तर प्रदेश आणि विदर्भामध्ये तर अनेक ठिकाणी तापमान ४७-४८ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले आहे. ज्यामुळे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे.

वाढत्या धोक्यामुळे सरकारकडून अनेक जिल्ह्यांत 'येलो अलर्ट' जारी केला आहे. उष्माघात हा या हवामान बदलाच्या सर्वात घातक परिणाम आहे. वाढत्या उष्णतेमुळे शरीराची तापमान नियंत्रण प्रणाली कोलमडते, ज्यामुळे भोवळ आजार किंवा मृत्यू ओढवू शकतो. सरकारी आकडेवारीनुसार, गेल्या दशकात देशात उष्णतेमुळे हजारो नागरिकांना आपला जीव गमवावा लागला आहे. शेतमजूर, बांधकाम कामगार आणि रस्त्यावरील विक्रेते यांसारख्या उघड्यावर काम करणाऱ्या वर्गाला याचा सर्वाधिक फटका बसत आहे. उष्णतेचे हे संकट केवळ आरोग्यापुरते मर्यादित नाही. कडक उन्हामुळे शेतीतील पिकांचे नुकसान होत आहे, ज्यामुळे अन्नसुरक्षेचा प्रश्न निर्माण होतोय. तसेच, वाढत्या वीज वापरामुळे ऊर्जेची टंचाई निर्माण होऊन वीज कपात करावी लागत आहे. 'थम उत्पादकता' कमी झाल्यामुळे देशाच्या जीडीपीवरही याचा नकारात्मक परिणाम होत असल्याचे जागतिक अहवाल सांगतात. उष्णतेमुळे पिकांवर ताण येतो आणि पाण्याची मागणी वाढते. हिमालयातील बर्फ वितळण्याचे प्रमाण कमी झाल्यामुळे नद्यांच्या पाणीपुरवठ्यावरही परिणाम होत आहे. राज्यातील विदर्भात, विशेषतः अकोला येथे तापमान ४६.९ अंश सेल्सिअसवर गेल्याने सध्या विदर्भ हा उष्माघाताचा 'हॉटस्पॉट' ठरला आहे. महाराष्ट्रात २०२६ च्या उन्हाळात आतापर्यंत उष्माघातामुळे ७ ते ८ जणांचा मृत्यू झाल्याची नोंद आहे. परभणीत ३७ वर्षीय व्यक्तीचा उष्माघाताने मृत्यू झाला असून, अहिल्यानगरात ४५ वर्षीय महिला शेतकरी शेतात काम करताना दगावली. नागपूर जिल्ह्यात बसने प्रवास करणाऱ्या ६५ वर्षीय प्रवाशाचा मृत्यू झाला, अशी उदाहरणे देता येतील. उष्णतेच्या लाटांमुळे शरीरातील पाणी कमी होणे (डिहायड्रेशन), उष्माघात आणि मृत्यूच्या प्रमाणात वाढ झाली आहे. सध्याच्या परिस्थितीत स्वतःची काळजी घेणे, मुक्या प्राण्यांसाठी पाण्याची सोय करणे आणि ऊन टाळून कामे करणे, हेच आपल्या हातात आहे. आरोग्य विभागाने दुपारी घराबाहेर न पडण्याचे, सुती कपडे वापरण्याचे आणि भरपूर पाणी पिण्याचे आवाहन केले आहे. मात्र, केवळ तात्पुरत्या उपाययोजनांनी हे संकट टळणारे नाही, हेही तितकेच महत्त्वाचे आहे. जागतिक तापमान वाढीमुळे पृथ्वीचे सरासरी तापमान वाढत आहे, ज्याचा थेट परिणाम भारताच्या उन्हाळ्यावर होतो आहे. दुपारी १२ ते ४ या वेळेत रस्त्यावर शुकशुकाट पहायला मिळत असल्याने अनेक शहरात 'अघोषित संचारबंदी' अनुभवला मिळत आहे. पॅसिफिक महासागरातील पाण्याच्या तापमानातील बदलांमुळे मान्सूनवर परिणाम होऊन उष्णतेची तीव्रता वाढली आहे. उष्माघाताचे संकट हे निसर्गाचे एक प्रकाराची प्रतिक्रिया आहे. आपण निसर्गाचा जो समतोल बिघडवला आहे, त्याचे परिणाम आता आपण भोगत आहोत. जर आपण आताच कार्बन उत्सर्जन कमी करणे आणि निसर्ग संवर्धनाकडे लक्ष दिले नाही, तर भविष्यकतो पिढ्यांसाठी हा उन्हाळा अधिक असह्य आणि प्राणघातक ठरेल.

धुंडिराज गोविंद फाळके: मुंबईत संस्कृतचे प्राध्यापक!

(३० एप्रिल: दादासाहेब फाळके जयंती विशेष)

दादासाहेबांच्या जन्मशताब्दींपासून भारत सरकारने दादासाहेब फाळके पुरस्कार देण्यास सुरुवात केली. हा भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वोच्च पुरस्कार आहे. याचे स्वरूप दहा लाख रुपये आणि सुवर्णकमळ असे आहे. भारतीय चित्रपटसृष्टीत उत्कृष्ट कामगिरी केलेल्या कलावंत-तंत्रज्ञाला या पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. भारतीय टपाल खात्यानेही दादासाहेबांच्या सन्मानार्थ त्यांचे छायाचित्र असलेल्या टपाल तिकिटाचे अनावरण केले. मुंबई येथील चित्रनगरी-फिल्मसिटी आता दादासाहेब फाळके चित्रनगरी या नावाने ओळखली जाते. दिग्दर्शक परेश मोकाशी यांनी हरिश्चंद्राची फॅक्टरी या चित्रपटातून दादासाहेबांचे कार्यकर्तृत्व प्रेक्षकांसमोर आणले. त्यांच्या हट्टरारीची कहाणी सांगते श्री एन. कृष्णकुमार यांची वाणी... संपादक.

दादासाहेब फाळके हे भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक आहेत. ते भारतीय चित्रपट निर्माते, दिग्दर्शक, पटकथाकार आणि चित्रपट महर्षी म्हणूनही ओळखले जातात. त्यांचे पूर्णनाव धुंडिराज गोविंद फाळके असे होते, पण ते दादासाहेब या नावानेच अधिक प्रसिद्ध होते. त्यांचा जन्मदि. ३० एप्रिल १८७० रोजी महाराष्ट्राच्या नासिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर येथे झाला. त्यांचे वडील गोविंदशास्त्री उर्फ दाजीशास्त्री व मातोश्री द्राक्षाबाई होत. दाजीशास्त्री स्वतः संस्कृत भाषेचे विद्वान आणि त्र्यंबकेश्वर मंदिराचे पुजारी होते. त्यामुळे दादासाहेबांचे बालपण धार्मिक वातावरणात व्यतीत झाले. दादासाहेब १२ वर्षांचे असताना दाजीशास्त्रींनी मुंबईतील एलफिन्स्टन कॉलेज येथे संस्कृताचे प्राध्यापक म्हणून नोकरी स्वीकारली. त्यामुळे फाळके कुटुंब मुंबईला स्थलांतरित झाले. दादासाहेबांना लहानपणापासूनच वेगवेगळ्या कला शिकण्याची आवड होती. त्यामुळे मुंबईच्या मराठा हायस्कूलमध्ये शालेय शिक्षण पूर्ण झाले. त्यानंतर सन १८८५मध्ये त्यांनी जे.जे.स्कूल ऑफ आर्ट्स येथून एक वर्षाचा चित्रकलेचा पदविका अभ्यासक्रम पूर्ण केला. मग बडोदा येथील महाराजा सयाजीराव विद्यापीठाच्या कलाभवनातून त्यांनी तैल रंगचित्रण, जल रंगचित्रण, वास्तुकला आणि नमुना प्रतिरूपण-मॉडेलिंग यामध्ये प्रावीण्य मिळवले. याचबरोबर त्यांनी छायाचित्रण, प्रकाश शिलामुद्रण- फोटोटिथोग्राफी या व्यावसायिक कलांचेही शिक्षण घेतले. त्यात विविध प्रयोगही केले. अहमदाबाद येथील सन १८९२मधील औद्योगिक प्रदर्शनात त्यांच्या आदरणीयांच्या प्रतिकृतीला सुवर्णपदक मिळाले. त्यांनी गुजरातमधील गोध्रा येथे व्यावसायिक छायाचित्रकार म्हणून व्यवसाय सुरू केला. पण तेथे त्यांचा जम बसला नाही. ते सन १९०० साली बडोद्याला परतले. मात्र त्यांच्यातला हरहुन्नरी माणूस त्यांना स्वस्थ बसू देत नव्हता. त्यांनी एका जर्मन जादूगाराकडून जादूची कला शिकून प्रोफेसर केल्फा या नावाने जादूचे प्रयोग दाखवायला सुरुवात केली. हे प्रयोग त्यांनी एका लघुपटात चित्रिताही केले.

दादासाहेबांचा पहिला विवाह सन १८८६मध्ये झाला. पण त्यांच्या पत्नीचे व मुलाचे गुजरातमध्ये प्लेगच्या साथीने सन १९०० साली देहावसान झाले. त्यानंतर दोन वर्षांनी त्यांचा विवाह सरस्वताबाई- पूर्वाश्रमीच्या गारिजा करंदीकर यांच्याशी झाला. सात मुले व दोन मुली असा त्यांचा परिवार बहरला.



सरस्वतीबाईंनी चित्रपट निर्मितीच्या सर्वच क्षेत्रांत दादासाहेबांना मोलाची मदत करत आयुष्यभर साथ दिली. दादासाहेबांनी चित्रपट निर्मितीच्या तंत्राचा अथक परिश्रम करून अभ्यास केला. परिणामस्वरूप १९११-१२च्या काळात अंधत्वही आले होते. पण चिकाटीने त्यांनी त्यावर मात केली. तत्कालीन भारतीय समाजव्यवस्थेत चित्रपट निर्मिती करताना सामाजिक अडचणींसोबतच आर्थिक अडचणीनाही त्यांना सामोरे जावे लागले. चित्रपटात काम करण्यासाठी स्त्री कलावंतच काय, पुरुष कलावंतही तयार होत नसत. अशावेळी गरज पडल्यास ते स्वत: किंवा कुटुंबियांपैकी कोणितरी ते ठरवे करीत. सुरुवातीच्या त्यांच्या चित्रपटातील स्त्री पात्रांच्या भूमिकाही त्यांनी पुरुषांकडूनच करून घेतल्या. त्यांना अनेक कला अवगत असल्यामुळे त्यांचा उपयोग त्यांनी चित्रपटनिर्मिती करताना केला. त्यामुळे ते चित्रपट तांत्रिकदृष्ट्या उत्तम असत. त्याकाळी परदेशातही चित्रपट निर्मिती करण्याचा प्रस्ताव त्यांच्यासमोर ठेवण्यात आला. पण त्या मोहाला बळी न पडता त्यांनी भारतातच चित्रपट निर्मिती केली. आपल्या देदीप्यमान कारकीर्दीत त्यांनी एकूण ९५ चित्रपट आणि २६ लघुपटांची निर्मिती केली.

दादासाहेबांनी सन १९०३ साली भारतीय पुरातत्व खात्यात प्रारूपकार आणि छायाचित्रकार म्हणून नोकरी पत्करली. या फिरतीच्या नोकरीमुळे त्यांना भारतातील अनेक वास्तुशिल्पे पाहता आली. परंतु स्वातंत्र्यलढ्यात लोकमान्य टिळकांनी सुरू केलेल्या बंगभंग चळवळीचा त्यांच्यावर प्रभाव पडला. चळवळीला साथ देत त्यांनी ही सरकारी नोकरी सोडून दिली. त्यांनी लोणावळ्याला फाळके एनग्रेव्हिंग अँड प्रिंटिंग प्रेस-बर्क्स ही संस्था सुरू केली. पुढे ती दादाला हलविली. तिचे रूपांतर लक्ष्मी आर्ट प्रिंटिंग वर्क्समध्ये झाले. सन १९०९मध्ये ते जर्मनीहून तीनरंगी मुद्रणप्रक्रियेचे अद्ययावत तांत्रिक शिक्षण घेऊन भारतात परतले व ही संस्था त्यांनी भरभराटीस आणली. मात्र दहा वर्षांत व्यवसायातील भागीदारांबरोबर बेबनाव झाल्यामुळे ते बेगळे झाले. यामुळे दादासाहेब उद्विग्न होते. याच दरम्यान त्यांनी मुंबईमध्ये लाईफ ऑफ जिझस ख्राईस्ट- ख्रिस्ताचे जीवन हा मूक चित्रपट पाहिला आणि त्यांच्या आयुष्यातले ध्यासपर्व सुरू झाले. स्वदेशी चित्रपट बनवायचा या विचाराने त्यांना झपाटून टाकले. भारतीय इतिहासातील महान व्यक्तिमत्व असलेल्या श्रीकृष्णाच्या जीवनावरही असाच चित्रपट बनवायचा ध्यास घेऊन अथक प्रयत्नांनी त्यांनी लंडनला जाऊन चित्रपट विषयक तांत्रिक ज्ञान मिळवले. तेथे आवश्यक यंत्रसामग्री आणि कच्चा माल मागविण्यासाठी नोंदणीही केली. ते भारतात परतले. तेथील वास्तव्यात प्रसिद्ध चित्रपट निर्माते सेसिल हेपवर्थ यांच्याशी त्यांचा परिचय झाला. सर्व सामग्री मे महिन्यामध्ये हाताशी आल्यावर प्रयोगाच्या जून-जुलैमध्ये रोपट्याची वाढ हा एका मिनिटाचा लघुपट तयार करून काही निवडक व्यक्तींना दाखवला. त्याचा योग्य परिणाम वाटल्याने पत्नीचे दागदागिने गहाण ठेवून भांडवल उभे केले. लवकरच मुंबई- दादर येथे फाळके चित्रपट निर्मितिगृहाची स्थापना केली. सहा महिन्यात मुंबईच्या कोरोनेशन चित्रपटगृहामध्ये त्यांनी निर्मिलेला राजा हरिश्चंद्र हा पहिला भारतीय बनावटीचा मराठी पूर्ण बोलपट सन १९१३ साली प्रदर्शित झाला. राजा हरिश्चंद्रच्या यशाने खच्चा अर्थाने भारतीय चित्रपट सृष्टीचा एक व्यवसाय म्हणून पाया रचला गेला. या चित्रपटाकरिता लेखक, छायालेखक, रंग वेशभूषाकार, कलादिग्दर्शक, संकलनकार, रसायनकार आदी सर्व भूमिका दादासाहेबांनी पार पाडल्या. या चित्रपटांनंतर त्यांनी मोहिनी भस्मासूर व सत्यवान सावित्री या चित्रपटांची निर्मिती केली. यांनाही चांगले व्यावसायिक यश लाभले. त्यांनी सन १९१४मध्ये पुन्हा इंग्लंडला प्रयाण केले. या वास्तव्यात त्यांनी निर्मिती केलेले चित्रपटही तेथील निर्मात्यांना दाखवले. या चित्रपटांतील तांत्रिक अंगांचे परदेशातही खूप कौतुक झाले.

भारतीय चित्रपट व्यवसायास २५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त मुंबईतील महत्त्सवात कृतज्ञतेचे प्रतिक म्हणून फाळके यांना पाच हजार रुपयांची थैली अर्पण करण्यात आली. आर्थिक विवंचनेतच वयाच्या ७४व्या वर्षी दि. १६ फेब्रुवारी १९४४ रोजी त्यांचे नासिक येथे निधन झाले.

!! जयंतीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन !!

श्री एन. कृष्णकुमार,
से.नि.अध्यापक.
(मराठी लेखक व कवी)
मु. रामनगर, गडचिरोली.

महाराष्ट्र.. (मराठी माणूस)

मराठी गौरव दिनी
प्रेमाने हसते मराठी
संपन्न महाराष्ट्रासम
उजाळे ज्ञान दिवटी

परप्रांतीय सोबतीने
भाषांची झालीटाटी
सगळ्या मराठी पाटी
रे मराठी जरी शेवटी

अभिजात दर्जा नसे
सौभाग्य का ललाटी
महाराष्ट्रदिनी निदान
मायावी भली गुलाटी

पुन्हा करे श्रीगणेशा
उजळे नवाक्षरे पाटी
सन्मान करीभाषेचा
नगरे ढोलकी पिटी

भाषेच्या समृद्धतेला
नमस्कार कैक कोटी
शिरोधार्य हो मराठी
करणार क्षणैक सुट्टी

अवघडगड चढताना
ती होते आधारकाठी
तुकोबा अभंग घेऊन
उभी चंद्रभागा काठी

मालवता प्राण ज्योत
ओठी ओघळे मराठी
पुन्हा जन्मो महाराष्ट्री
बनूनि माणूस मराठी

- हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६.

ट्युशन ..

नाईटी प्लस यशस्वी
विद्यार्थी त्वरित गाठा
हारफुले पेढ्यांचे पुडे
महोत्सवे सर्वसिभेटा

कॅमेरे चॅनेलवाल्यांचा
सोबत घे फौज फाटा
रेअभ्यासू विद्यार्थ्यांचे
श्रेयही आपणचलाटा

जाहीर करुन टाकावे
आमचाचं बरे हा पट्टा
सत्काराचे नावाखाली
गळ्यांत नावाचा पट्टा

फ्लेक्स बोर्ड झळकले
जाहिरातीत खर्चमोठ्ठा
आयुष्यभविष्य जुगार
उधडपणे चालवे सट्टा

कसला भरला बाजार
कोवळ्या मुलांचीथट्टा
खाजगी शिकवण्यांचा
संसार चाणाक्षते थाटा

कुणा गरजूविद्यार्थ्यांस
घायच्या थोड्या नोटा
दावणीस बांधून त्यांना
विकत घ्यायच्या वाटा

नैतिकता जरा शिकवा
ट्यूशनवाल्या या माठा
डोके आपले सांभाळा
कुणीही बांधणार फेटा

- हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६

१९,३०० ची लाश!

बँकेच्या दरवाज्यावर
आज एकही ग्राहक आला
नाही'कागद VS हाडं'

बँक म्हणाली
'कागद आणच्ह'
तो काही बोलला नाही,
माती उकरली
बहिण उचललीच्ह
हाडं खांद्यावर घेतलीच्ह
आणि निघाला
पाच किलोमीटर...

आता सांग
कागद मोठा की ही हाडं?
जिवंत असताना
तिचं नाव नव्हतं कुठेचच्ह

मेल्यावर मात्र
प्रमाणपत्र हवं म्हणे!
म्हणजे काय?
गरीब माणूस
जगतानाही खोटा,
मेल्यावरही खोटाच?
तो पैसे मागायला गेला नव्हता,
त्याचं हक्क मागायला गेला
होताच्ह

पण तिथे हक्कही
फॉर्ममध्ये अडकतो...

त्याच्या खांद्यावर
बहिणीचा कंकाळ नव्हता ,
ती तुमची सिस्टीम होती
सडलेली...

आणि हो
आज ती दुसऱ्यांदा मेली
पहिल्यांदा मातीखाली,
आणि आता
तुमच्या नियमाखाली...

आज एक प्रश्न आला आहे
त्याच्या हातात पासबुक नाही
एक सांगाडा आहे
तो फॉर्म भरू शकत नाही
तो सही करू शकत नाही
पण त्याने इतिहासावर
एक गडद ठसा उमटवला आहे
हाडांनी

कबरची माती अजून ओलसर
होती
जणू बहिणीचे शेवटचे श्वास
मातीमध्ये अडकून राहिले होते
आणि एक भाऊ
स्वतःच्या रक्ताच्या हाडांना
खोदत



राज्याच्या दरवाज्यावर
ठोठावत होता

'पुरावा आणा : जिवंत
किंवा मृत'
कागदांच्या जंगलात
बसलेले
तोंडात नियमांचे
खिळे ठोकून बसलेले
अधिकारी म्हणाले
म्हणतात
ही 'प्रणाली' आहे
नियम आहेत, प्रक्रिया
आहे, कायदा आहे...
पण आज
एका गरीब
आदिवासीने
तुमचे नियम
आपल्या बहिणीच्या
हाडांमध्ये गुंडाळून
तुमच्यासमोर
आपटले आहेत

तुम्ही म्हणता
'खातेदार येईल, तेव्हाच पैसे
मिळतील.'
तो विचारतो
'मरणानंतर कोण येतं?'
तुमच्याकडे उत्तर नाही
फक्त शांतता आहे
आणि तीही
एसीच्या आत बसलेली

दोन महिने
तो तुमच्या दरवाज्यावर
माणूस म्हणून येत राहिला
तुम्ही त्याला हाकलून दिलं
आज तो सांगाडा बनून आला
आहे
आणि तुम्ही घाबरलात

ऐका
ही भीती त्याचीच आहे
ज्याला तुम्ही जन्म दिला आहे
हा सांगाडा
फक्त एका बहिणीचा नाही
तुमच्या माणुसकीचा आहे
जी खूप आधीच मेली आहे

गावकऱ्यांनी त्याला वेडा
म्हटलं
बँकेवाल्यांनी नियम सांगितले
पोलीसांनी केस केली
पण कुणीच पाहिलं नाही
की हा माणूस
खरंतर सगळ्यात शहाणा
आहे
कारण त्याने समजून घेतलं
आहे :
या देशात
जिवंत माणसाची काहीच
ओळख नाही
पण मृत शरीराचे
पोस्टमॉर्टम होऊ शकते
इथे माणसं नाहीत
लाशाच मान्य कागदपत्रं
आहेत

हा फक्त एक भाऊ नाही
ही संपूर्ण समाजाची उघडी
पडलेली नस आहे
ज्यातून रक्त नाही
तर व्यवस्थेची सडलेली दुर्गंधी
टिबकत आहे
कबरमधून बाहेर आलेला
सांगाडा
आता फक्त बहिणीचा
राहिलेला नाही
तो या लोकशाहीचा कणा आहे
जो खूप आधीच तुटून गेला
होता

आज तो गर्दीत उभा आहे
हास्य आणि भीतीच्या मध्ये
एक प्रश्न बनून
'आता मान्य कराल?'
आणि सत्ता?
ती डोकं खाली घालून फाईल
पलटत आहे...
कारण
तिच्याकडे प्रत्येक मृत्यूची नोंद
आहे
पण प्रत्येक अन्यायाची नाही

ही कविता नाही, ही चार्जशीट
आहे
ज्यात आरोपी आहेत :
तुमची व्यवस्था
तुमचा कायदा
आणि तो संपूर्ण ढाचा
जो गरीबाला सांगतो
'आधी मरण्याचा पुरावा आणा
मग जगण्याचा हक्क मिळेल.'

- राहुल पवार कराड

वन स्टॉप सेंटर: पीडित महिलांच्या हक्काचे माहेरघर; अमरावतीत एका वर्षात १९६ महिलांना मदतीचा हात



संकटग्रस्त महिलांना एकाच छताखाली सर्व प्रकारची मदत मिळावी या उद्देशाने केंद्र पुरस्कृत 'मिशन शक्ती' योजनेअंतर्गत अमरावती जिल्ह्यात 'वन स्टॉप सेंटर' (ध्एए) प्रभावीपणे कार्यरत आहे. महिला व बाल विकास मंत्रालय आणि जिल्हा महिला व बाल विकास विभाग, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने राबविल्या जाणाऱ्या या उपक्रमातून गेल्या एका वर्षात तब्बल १९६ पीडित महिलांना विविध प्रकारची मदत व आधार देण्यात आला आहे.

सर्वकष सुविधा 'एकाच छताखाली'

कौटुंबिक हिंसाचार, लैंगिक छळ, महिला तस्करी, ?सिड हल्ला किंवा कोणत्याही प्रकारच्या मानसिक व शारीरिक जोखमा सामोरे जाणाऱ्या महिलांसाठी हे केंद्र म्हणजे एक सुरक्षित आश्रयस्थान ठरत आहे. येथे पीडित महिलांना न्याय, सुरक्षा, कायदेशीर मदत, पोलीस मदत, समुपदेशन, वैद्यकीय सहाय्य आणि तात्पुरता निवारा अशा सर्व सुविधा विनाविलंब उपलब्ध करून दिल्या जातात.

वन स्टॉप सेंटरचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे येथे येणाऱ्या पीडित महिलेचे वय, शिक्षण, वैवाहिक स्थिती याचा विचार न करता तिला तत्काळ आधार दिला जातो. अमरावती येथे सन २०१७ पासून हे केंद्र अविरतपणे सेवा देत असून, हिंसाचाराने बाधित झालेल्या महिलांचे पुनर्वसन करण्यासाठी हे केंद्र कटिबद्ध आहे.

२४ तास अखंड सेवा आणि संपर्क

संकटग्रस्त महिलांसाठी ही सेवा २४ तास सुरू असते. जिल्हा स्त्री रुग्णालय परिसर, अमरावती येथे हे केंद्र स्थित असून, मदतीसाठी ९३७१७०८५३५ किंवा ७७२०८८४१९८ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधता येईल. तसेच, हिंसाचाराने पीडित महिला १८१ या हेल्पलाईन क्रमांकावर कॉल करून कधीही मदत मिळवू शकतात.

समाजात कोठेही पीडित महिला आढळल्यास त्यांना या केंद्राचा लाभ मिळवून देण्यासाठी पोलीस विभाग, सामाजिक संस्था, आशा वर्कर, अंगणवाडी सेविका मदत करतात. पीडित महिलांसाठी वन स्टॉप सेंटर म्हणजे हक्काचे माहेरघरच आहे!

अपर्णा वावलकर
माहिती अधिकारी,
जिल्हा माहिती कार्यालय,
अमरावती

जनप्रभात हे दैनिक जनप्रभात हे दैनिक पत्र मालक,प्रकाशक,मुद्रक :संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा प्रिंटर, नवीन आष्टा, ता. आष्टी, जि.वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय, नवीन आष्टी ता. आष्टी, जि.वर्धा ४४२२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९(या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक, मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) RNI NO : MAHMAR/2022/82242

भाटघर गावच्या सरपंच सौ. सविता संजय वीर यांना नालंदा ऑर्गनायझेशनचा 'आदर्श सरपंच पुरस्कार' प्रदान.

ग्रामविकास क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीची दखल, खंडाळा तालुक्यासह सातारा जिल्ह्याची उंचावली मान

प्रतिनिधी/ प्रविण वीर

सातारा : खंडाळा तालुक्यातील भाटघर गावच्या सरपंच सौ. सविता संजय वीर यांना त्यांच्या उल्लेखनीय ग्रामविकास कार्यासाठी नालंदा ऑर्गनायझेशन संस्थेचा ग्राम समृद्धी योजना राज्यस्तरीय पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला आहे. हा सन्मान पुण्यातील पत्रकार भवन, नवी पेठ येथील कमिन्स हॉल सभागृहात आयोजित कार्यक्रमात प्रदान करण्यात आला. या गौरव पुरस्काराने भाटघर गावचीच नव्हे तर संपूर्ण सातारा जिल्ह्याची मान उंचावली आहे.

नालंदा ऑर्गनायझेशनने ग्रामीण भागात समृद्धी साधणाऱ्या विविध क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचा शोध घेऊन हा पुरस्कार दिला. सरपंच सौ. सविता संजय वीर यांनी आपल्या सरपंच पदाच्या कार्यकाळात विविध योजनांची

प्रभावी अंमल बजावणी सह ग्रामस्थांच्या सक्रिय सहभागातून भाटघर गावामध्ये विकासाचे नवे पर्व उभारले. त्यांच्या कार्यात त्यांचे पती श्री. संजय रामचंद्र वीर यांनीही महत्त्वपूर्ण पाठिंबा दिला.



या पुरस्कार वितरण सोहळ्याला डॉ. मिलिंद दहिते सर (चेअरमन, ए.आर.जे. एशिया ग्रुप), डॉ. अनिल आबचीते सर (अधिकारी, पुणे आयुक्तालय) व अभिनी खंडागळे (कृषी विभाग, पुणे) आदी मान्यवरांची उपस्थिती होती. संपूर्ण सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला. हा पुरस्कार सौ. सविता वीर यांना मिळाल्याने खंडाळा तालुका व भाटघर गावात आनंदाचे वातावरण आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मा. मकरंद आबा पाटील व पक्षाच्या विविध वरिष्ठ नेत्यांनी सरपंच सौ. सविता संजय वीर यांचे अभिनंदन करत त्यांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. तसेच ग्रामपंचायतीचे सर्व पदाधिकारी व ग्रामस्थांनीही आपल्या प्रतिक्रिया व्यक्त करत सरपंच सौ. सविता संजय वीर यांचा सन्मान हे भाटघर गावासाठी अभिमानाचे पाऊल असल्याचे म्हटले आहे.



लोणी मध्ये संयुक्त जयंती महोत्सवाचे आयोजन

प्रतिनिधी/ कैलास गायकवाड

लोणी : लोणी ता. आंबेगाव येथे सम्यक मित्र मंडळ यांच्या वतीने शुक्रवार दि. एक जानेवारी २०२६ रोजी विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती व सर्व महामानवांच्या संयुक्त जयंतीचे आयोजन केले आहे. सकाळी दहा वाजता ध्वजारोहण, दहा वाजून तीस मिनिटांनी बुद्ध वंदना दुपारी दोन वाजता स्नेहभोजन, चार ते सहा भव्य मिरवणुकीचे आयोजन, सहा ते आठ जाहीर सभा, रात्री आठ वाजता भोजन रात्री साडेनऊ वाजता संगीत कार्यक्रम व भीम गीते.सदर कार्यक्रमात नुकताच आंबेगाव भूषण पुरस्कार प्राप्त झालेले महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार्थी पत्रकार कैलासराव गायकवाड, सेवानिवृत्त कृषी संचालक प्रकाश सोनवणे, व महिला उद्योजक ज्योती गोरडे, तसेच नवनिर्वाचित उपसरपंच राजेंद्र पाटील, व स्पर्धा परीक्षेमध्ये महसूल सहाय्यक निवड झालेल्या मोहिनी मारुती सुरवसे, मुंबई पोलीस पदी निवड झालेले बाळासाहेब रमेश कदम यांचा सत्कार रामस्थ व सम्यक मित्र मंडळाच्या वतीने करण्यात येणार आहे. कार्यक्रमाला सर्वांनी उपस्थित राहण्याचे आवाहन राष्ट्रप्रेमी युवक मंडळ लोणी, समस्त ग्रामस्थ लोणी, व सम्यक मित्र मंडळ लोणी यांनी केले आहे.

लोणी येथे जलतारा प्रबोधन कार्यशाळेचे आयोजन

प्रतिनिधी/ कैलास गायकवाड

लोणी : लोणी ता आंबेगाव येथे लोणी ग्रामस्थांतर्फे व ग्रामपंचायत लोणी यांच्या वतीने जर तारा प्रबोधन कार्यशाळेचे आयोजन केले आहे. दुष्काळी भागातील आपल्या शेतीमध्ये बाराही महिने पाणी कसे राहील ? व पाण्याची संवर्धन कसे होईल याबाबत प्राध्यापक डॉ. पुरुषोत्तम वायाळ जलतारा जनक व संशोधक, जलतारा प्रकल्प समन्वयक, सदस्य सदस्य आदर्श गाव समिती महाराष्ट्र राज्य, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना सदस्य,महाराष्ट्र शासन प्रशिक्षक व मार्गदर्शक यांच्या कार्यशाळेचे आयोजन केले आहे. तरी शेतकऱ्यांनी लोणी, खडकवाडी, वडगावपीर, मांदळेवाडी, धामणी, पहाडदरा, शिरदाळे, खडकवाडी, रानमळा या सर्व शेतकऱ्यांनी व ग्रामस्थांनी जलतारायचा कार्यशाळे साठी हजर राहावे असे आवाहन लोकनियुक्त सरपंच लोणी डॉ. सावळाभाऊ नाईक, उपसरपंच राजेंद्र वाळुंज पाटील , पोलीस पाटील संदीप आढाव व सर्व ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामस्थांनी केले आहे.



प्रा.डॉ.पुरुषोत्तम वायाळ
जलतारा संकल्पनेचे जनक

महा डायलिसीस योजनेअंतर्गत नवीन बारा डायलिसीस केंद्रांचे १ मे रोजी होणार लोकार्पण

किडनी विकारग्रस्तांना दिलासा

मुंबई : ग्रामीण भागातील किडनी विकारग्रस्त रुग्णांना शासकीय दवाखान्यात मोफत डायलिसीस सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या 'महाडायलिसीस' योजनेचा राज्यात महाराष्ट्र दिनी विस्तार करण्यात येणार आहे. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते १ मे रोजी नवीन बारा डायलिसीस केंद्राचे लोकार्पण करण्यात येणार आहे. राज्यातील किडनी विकारग्रस्त नागरिकांना मोफत डायलिसीस सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने 'महाडायलिसीस' योजना सध्या विविध शासकीय रुग्णालयांत प्रभावीपणे राबवली जात आहे. या सुविधेमुळे राज्यातील हजारो किडनी विकारग्रस्त रुग्णांना मोठा दिलासा मिळत आहे.

ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा तसेच जिल्हा रुग्णालयांपर्यंत ही सेवा पोहोचवून ग्रामीण भागातील रुग्णांना घराजवळच निःशुल्क उपचार मिळावेत, हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. ग्रामीण रुग्णालयांत किमान ५ बेडस, तर उपजिल्हा व जिल्हा रुग्णालयांत ८ ते १० डायलिसीस बेड्सची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. सध्या राज्यात ९२ महाडायलिसीस केंद्रे कार्यरत असून त्यामध्ये ५५८ डायलिसिस बेड्स उपलब्ध आहेत.

महाराष्ट्र दिनी सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते १२ नवीन केंद्रांचे लोकार्पण होणार असून, त्यामुळे एकूण केंद्रांची संख्या १०४ वर पोहोचणार आहे. या नव्या केंद्रांमध्ये दुर्गम भागातील रुग्णालयांचाही समावेश करण्यात आला आहे.

लोकार्पण होणाऱ्या केंद्रांमध्ये मुरगुड (जि. कोल्हापूर), मूल (जि. चंद्रपूर), दारव्हा (जि. यवतमाळ), केज (जि. बीड), इगतपुरी (जि. नाशिक), रावेर (जि. जळगाव), मंगळवेढा (जि. सोलापूर), बेबेवाडी (जि. सातारा), वेंगुर्ला (जि. सिंधुदुर्ग), कुरखेडा (जि. गडचिरोली), दापोली (जि. रत्नागिरी) आणि बदलापूर (जि. ठाणे) येथील रुग्णालयांचा समावेश आहे.

'महाडायलिसीस' योजना एंड-टू-एंड डिजिटल प्लॅटफॉर्मवर आधारित असून, पुढे 'रेनिसेन्स' या संकेतस्थळावर तसेच मोबाइल ॲपद्वारे माहिती व सेवा उपलब्ध आहेत. रुग्णांना ऑनलाईन स्लॉट बुकिंगची सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे उपचारासाठी प्रतीक्षा कालावधी कमी झाला आहे. या केंद्रांमध्ये प्रशिक्षित डायलिसीस तंत्रज्ञ, नर्सेस व सहाय्यक कर्मचारी कार्यरत असून, नेफ्रोलॉजिस्ट यांच्या मार्गदर्शनाखाली उपचार दिले जात आहेत. स्वच्छता, सुरक्षितता आणि वैद्यकीय मानकांचे काटेकोर पालन केले जात आहे. तसेच रक्त तपासणी, आवश्यक इंजेक्शन आणि आहारतज्ज्ञांचा सल्ला यांसारख्या सेवा रुग्णांना पूर्णतः मोफत दिल्या जातात.

ही योजना केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाअंतर्गत एचएलएल लाइफकेअर लिमिटेड या संस्थेमार्फत राबवली जात असून, सर्व केंद्रांमध्ये गुणवत्तापूर्ण सेवा देण्यावर भर दिला जात आहे. 'महाडायलिसीस' योजनेमुळे खासगी उपचारांवरील आर्थिक भार कमी होऊन सरकारी रुग्णालयांतच दर्जेदार व मोफत सेवा उपलब्ध झाल्याने राज्याच्या आरोग्य व्यवस्थेला मोठी बळकटी मिळत आहे.

जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर स्वप्नपूर्ती; संगीता बबन दहिफळे यांना पीएच.डी. पदवी प्राप्त

पुणे : पाथर्डी तालुक्यातील चिंचपूर इजदे (विठ्ठलवाडी) येथील मूळ रहिवासी व सध्या खराडी (पुणे) येथे वास्तव्यास असलेल्या संगीता बबन दहिफळे यांनी अथक परिश्रम, जिद्द आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांच्या जोरावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून पीएच.डी. पदवी यशस्वीरित्या संपादन केली आहे.



'उत्तर आधुनिक काळातील स्त्रीवादी कथासाहित्यातील सामाजिक दृष्टिकोनातून अभ्यास (२००० ते २०१५)' या विषयावर त्यांनी संशोधन पूर्ण केले आहे. या संशोधनाद्वारे त्यांनी समाजातील रूढी-परंपरा, स्त्रियांवर होणारा अन्याय, तसेच स्त्रियांचे कुटुंब व समाजातील स्थान यांचा सखोल अभ्यास करून ते अधोरेखित केले आहे.

शैक्षणिक प्रवासात अनेक अडचणी आणि आव्हाने येऊनही त्यांनी कधीही हार न मानता आपल्या ध्येयाकडे सातत्याने वाटचाल केली. त्यांच्या या यशामागे प्राचार्य डॉ. संजय नगरकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच कुटुंबीय आणि सहकाऱ्यांनी दिलेल्या पाठिंब्यामुळे हे यश अधिक भक्कम झाले आहे.

संगीता बबन दहिफळे या सध्या श्री म्हसोबा शिक्षण प्रसारक मंडळ, निमगाव म्हाळुंगी संचलित तात्यासाहेब खंडेराव सोनवणे विद्यालय, निर्वी (ता. शिरूर, जि. पुणे) येथे कार्यरत असून, त्यांनी आपल्या कर्तृत्वातून समाजातील तरुण-तरुणींसमोर एक प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे.

त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल शैक्षणिक क्षेत्रातून तसेच मित्रपरिवाराकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

श्री गुरु बुद्धिस्वामी महाविद्यालय पूर्णा येथील परीक्षा केंद्रावर स्वा. रा. ती. म. विद्यापीठ नांदेड उन्हाळी परीक्षा संपन्न

प्रतिनिधी/अरविंद कांबळे

परभणी : दिनांक २८ एप्रिल २०२६ रोजी श्री गुरु बुद्धिस्वामी महाविद्यालय पूर्णा येथील परीक्षा केंद्र क्रमांक २११ वर स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड उन्हाळी परीक्षा २०२६ शांततेत शिस्तब्ध पद्धतीने संपन्न झाल्या.



महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. राजकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्रप्रमुख म्हणून प्रा. डॉ. राजू शेख सहकेंद्रप्रमुख म्हणून प्रा.डॉ.अलका कौसडीकर टेक्निकल म्हणून प्रा. डॉ. रवींद्र राख क्लार्क श्री संजय कापुरे मदतनीस म्हणून मंचक वळसे, नागोराव सावळे, कालिदास वैद्य यांनी काम केले.तसेच महाविद्यालय स्तरावर लोकल स्कॉड म्हणून उपप्राचार्य शिवसांब कापसे व प्रा.डॉ.गजानन कुरंदकर, प्रा. डॉ.जितेंद्र पुल्ले, प्रा.डॉ.दैवशाला कमठाणे, प्रा.डॉ.गंगाधर कापुरे,प्रा.डॉ. वृषाली ओंबटकर, प्रा.डॉ.पल्लवी चव्हाण यांनी सकाळ व दुपार या दोन्हीही सत्रात अत्यंत व्यवस्थित काम केले. श्री गुरु बुद्धिस्वामी महाविद्यालय पूर्णा येथील परीक्षा केंद्रावर परीक्षार्थी म्हणून परीक्षेसाठी एकूण विद्यार्थी संख्या १५८३ होती.परीक्षा दिनांक १ एप्रिल पासून सुरुवात झाली होती. आज २८ एप्रिल रोजी ३५ सत्रात संपन्न झाली.कोणताही अनुचित प्रकार न होता अतिशय शिस्त व शांततेत परीक्षा संपन्न झाल्याबद्दल संस्थेचे कार्याध्यक्ष प्रमोदअण्णा एकलारे, सचिव अमृतराज कदम, सहसचिव प्रा. गोविंदराव कदम यांनी परीक्षेत काम करणाऱ्या सर्व प्राध्यापक व कर्मचाऱ्याचे अभिनंदन केले.

लोणी येथील पारायण सोहळ्यात रामायणाचार्य ढोक महाराजांचे प्रतिपादन

प्रतिनिधी / ज्ञानेश्वर साबळे

लोणी : 'धावपळीच्या आणि भौतिक सुखाच्या मागे लागलेल्या आजच्या धावपळीच्या युगात मानवी मनाला खरी शांती केवळ अध्यात्मातूनच मिळू शकते. अध्यात्म म्हणजे केवळ पूजा-अर्चा नसून, स्वतःचा शोध घेणे आणि सद्गतीने जगणे होय,' असे प्रतिपादन प्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. रामायणाचार्य रामराजजी महाराज ढोक यांनी केले. लोणी बुद्रुक येथे आयोजित अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याच्या दुसऱ्या दिवशी कीर्तनपुष्प गुंफताना ते बोलत होते. पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील आणि लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित या सोहळ्यामुळे सध्या संपूर्ण लोणी परिसर भक्तिमय झाला आहे.

अध्यात्माचे महत्त्व सांगताना ढोक महाराज पुढे म्हणाले की, संतांनी रचलेला ज्ञानेश्वरीसारखा ग्रंथ आपल्याला जगण्याची कला शिकवतो. भौतिक प्रगती कितीही झाली, तरी जोपर्यंत अंतर्मनात ईश्वरी नामाचा जप आणि विचारांची शुद्धता नसेल, तोपर्यंत जीवनात समाधान लाभत नाही. अध्यात्म हे माणसाला संकटात ध्येर्य देते आणि सुखात नम्र राहायला शिकवते. ज्ञानेश्वरींच्या ओव्यांमधून मिळणारा उपदेश केवळ वाचण्यासाठी नसून तो आचरणात आणण्यासाठी आहे, असेही त्यांनी यावेळी आवर्जून सांगितले. श्रीराम मंदिर प्रांगणात जमलेल्या शेकडो भाविकांनी या निरूपणाचा लाभ घेतला.

या सोहळ्याचे नियोजन लोणी बुद्रुक ग्रामस्थांच्या वतीने अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने करण्यात आले आहे. पहाटेच्या काकडा भजनापासून ते रात्रीच्या हरि कीर्तनापर्यंत सर्व कार्यक्रम वेळेत पार पडत आहेत. दुसऱ्या दिवशी दुपारी दुर्गापूर, चंद्रापूर आणि दाद येथील भजनी मंडळांनी आपल्या भजनांमधून उपस्थितांची मने जिंकली टाळ मृदंगाच्या गजरात हरी कीर्तनाचा सर्वांनी लाभ घेतला पाहिजे त्यामुळे जगण्यातही कुटेतरी सकारात्मकता येऊन संकटावर मात करता येते. हरिनामाने अवघा परिसर हरिनामाने भक्तीमय झाला आहे या सोहळ्यामुळे केवळ धार्मिक वातावरणच निर्माण झाले नसून, सामाजिक एकता आणि संस्कारांची रुजवणूक होत असल्याचे चित्र लोणीमध्ये पाहायला मिळत आहे. येत्या ५ मे पर्यंत हा ज्ञानाचा यज्ञ असाच सुरू राहणार असून, भाविकांनी मोठ्या संख्येने या अमृतवाणीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.



महात्मा फुल्यांनी मूळ बहुजननिष्ठ भारतीय परंपरेचे पुनर्जीवन केले : प्रा. निरंजन फरांदे

सातारा : महात्मा जोतीराव फुले हे आधुनिक भारताच्या जडणघडणीचा प्रारंभ करणारे युगप्रवर्तक महापुरुष होते. त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत व विशेष अशी कोणतीही साधने हाताशी नसताना भारतातील मूळ बहुजन परंपरेचा घेतलेला शोध हा या देशाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहासाला कलाटणी देणारा ठरला आहे. खऱ्याखरच त्यांनी मूळ बहुजननिष्ठ भारतीय परंपरेचे पुनर्जीवन केले. असे असे प्रतिपादन प्रा. निरंजन फरांदे यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जंयती महोत्सव समिती आयोजित क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीबा फुले यांच्या द्वीशताब्दी जंयती व महाड चवदार तळे सत्याग्रह शताब्दी वर्षा निमीत्त येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासजवळ सांस्कृतिक सभागृहात प्रा. निरंजन फरांदे यांचे, 'क्रांतिसूर्य जोतिबा फुले यांचे समग्र विचार' या विषयावर व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी समितीचे अध्यक्ष गणेश कारंडे होते.

प्रा. निरंजन फरांदे म्हणाले,

'या देशात असणाऱ्या कृषक संस्कृतीचे प्रतिपादन करून त्यानंतरच्या काळात बहुजनांवर लादल्या गेलेल्या प्रथा , परंपरा, ग्रंथप्रामाण्य याची तर्ककठोर चिकित्सा करण्याचे जोतीरावांनी दाखवलेले धारिष्ट्य ही भारताच्या पाच हजार वर्षांच्या इतिहासातील सर्वात महत्त्वाची घटना आहे. त्यामुळे शोषण व्यवस्थेचे वरुड डासळले आणि समतेचा व मानवतेचा विचार या



भूमीमध्ये ताकतीने मांडला गेला. फुल्यांच्या कामामुळे परिवर्तनाच्या चळवळीची काही एक पायाभरणी झाली. त्याच वाटेने पुढे जात डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही विचारपरंपरा अधिक व्यापक व उन्नत बनवण्याचे काम केले. सिंधु संस्कृतीचा शोध व त्या पश्चिरात उत्खनन होण्यापूर्वी महात्मा फुल्यांनी या संस्कृतीच्या अनुषंगाने केलेले ऊलेखन त्यांच्या संशोधनवृत्ती व तात्विक सामर्थ्याचे प्रतीक म्हटले पाहिजे. त्यांनी मूळ असुरपरंपरेचा , बळीराजाचा केलेला गौरव आणि बहुजनांवर अन्याय करणाऱ्या रूढी परंपरांना मोडीत काढण्यासाठी केलेला संघर्ष या देशातील समाजक्रांतीचा प्रथम पुकारा करणारा होता. आजही सत्यशोधक विचारांची समाजाला नितांत आवश्यकता असून त्या दृष्टीने फुल्यांचे विचार कालातीत आहेत.'

'सर्व समावेशक क्रांतीसूर्य महात्मा जोतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या जीवनात केलेली आंदोलने, सत्याग्रह व त्यांचे समग्र विचार यावर वैचारिक मंथन चिंतन पर विचारांचा जागर वर्षभर होणार आहे. तेव्हा छ.शिव-फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचारांच्या विविध सामाजिक राजकीय संघटणा, संस्था व प्रतिष्ठान यांचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी योगदान दिले पाहिजे.' अशा आशयाची माहिती अध्यक्ष गणेश कारंडे यांनी अध्यक्षस्थानावरुन बोलताना सांगितली. प्रथमतः डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यास व तदनंतर म.फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून प्रा.निरंजन फरांदे,मिनाज सय्यद, गणेश कारंडे आदींनी अभिवादन केले.यावेळी जिल्हा भारतीय बौद्ध महासभेचे महासचिव यशपाल बनसोडे, साहित्यिक प्रकाश काशीळकर व समितीचे उपाध्यक्ष माणिक आढाव यांनी क्रांतिकारक गाणी सुमधुर आवाजात गाऊन वातावरण निर्मिती केली.समितीचे प्रमुख इंजि. रमेश इंजे व कार्याध्यक्ष पीएसआय रामदास वाघमारे व कोषाध्यक्ष प्राचार्य रमेश जाधव यांनी स्वागत केले.कोषाध्यक्ष चंद्रकांत खंडाईत यांनी प्रास्ताविक केले.अनिल वीर यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला.शिवाय, सूत्रसंचालनही केले.सचिव मारुती भोसले यांनी आभारप्रदर्शन केले.

सदरच्या कार्यक्रमास जिल्हा भारतीय बौद्ध महासभेचे हिशेब तपासनीस नंदकुमार काळे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते विजय गायकवाड,समितीचे प्रमुख मार्गदर्शक तथा संबोधी प्रतिष्ठानचे अध्यक्ष इंजि.रमेश इंजे,कोषाध्यक्ष प्रा.रमेश जाधव, कोअर कमिटीचे प्रमुख प्राचार्य राजेंद्र भिंगारदेवे, सम्यक ज्येष्ठ नागरिक संघाचे बी.एल.माने, धम्मशील चॅरिटेबल ट्रस्टचे विलासराव कांबळे, डॉ.विलास खंडाईत,डॉ.दत्तात्रय जाधव, संजीव बोडे, प्रकाश खटावकर, शाहीर श्रीरंग रणदिवे व प्रकाश फरांदे, ?ड.कुमार गायकवाड, ?ड. प्रभाकर कांबळे,पी.टी. कांबळे (बापू), ?ड.सुनील माने, ?ड. विलास वहागावकर, ?ड. प्रियंका गडदे,माजी प्राचार्य अरुण गाडे व प्रकाश रणवागले, मधुकर आठवले,प्रशांत लादे, संजय नितनवरे,दीपक ढाणे, अनिल कांबळे, पुंडलिक पाटोळे,विश्वास सावंत,अंकुश धाईजे,उत्तमराव पोळ, शिवनाथ जावळे,नंदकुमार आवळे,तानाजी भिंगारदेवे,चंद्रकांत मस्के,सुहास पुजारी,वामन मस्के,डॉ अरुण गाडे,अशोक कांबळे,अरुण साळुंखे,प्रदीप मस्के, कीर्तीकुडाव उत्तम,सुभाष सोनावणे,सचिन माने,उपसरपंच श्रीरंग वाघमारे,डी.दीपक, नासिर खान, एकनाथ तेलतुंबडे, धम्मबांधव उत्सव कमिटीचे अध्यक्ष अशोक भोसले व कोषाध्यक्ष विकास तोडकर, समितीचे पदाधिकारी, सदस्य, विविध संघटनांचे प्रतिनिधी, विविधक्षेत्रातील मान्यवर व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भिमाबाई आंबेडकर कन्या विद्यामंदिर ची श्रेया मंडले हिचे एन एम एम एस शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश



कु.मंडले श्रेया प्रकाश या विद्यार्थ्यांनीना शिष्यवृत्ती प्राप्त झाली असून शिष्यवृत्ती रक्कम १२००० प्रमाणे अशी चार वर्षे मिळणार आहे विद्यालयातील एकूण ५५ विद्यार्थी परीक्षेला बसले होते त्यामध्ये ४४ विद्यार्थी पास झाले असून एकूण निकाल ८० ट्क्केगलाआहे सर्व यशस्वी विद्यार्थी यांचे शैक्षणिक राजकीय सामाजिक क्षेत्रातून अभिनंदन होत आहे यशस्वी विद्यार्थी यांना विशेष मार्गदर्शन शाळेच्या मुख्याध्यापिका सौ जंगम एस एम तसेच सर्व शिक्षक स्टाफ व विद्यार्थी यांच्या पालकांचे लाभले

प्रतिनिधी/ धनश्री मल्मे

सातारा : रयत शिक्षण संस्थेचे भिमाबाई आंबेडकर कन्या विद्यामंदिर सातारा इयत्ता आठवी एन एम एम एस शिष्यवृत्ती परीक्षा २०२५-२६ मध्ये घेण्यात आली होती या मध्ये विद्यालयात कु. महात आयेशा अकबर कु. मसुगडे मेघा तानाजी

शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मागण्या पूर्ण करण्यास शासन सकारात्मक - शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर

मुंबई : राज्यभरातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या विविध प्रलंबित मागण्या आणि त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी शासन सकारात्मक असल्याचे शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी सांगितले.

शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या विविध प्रश्नाबाबत मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी राज्यमंत्री डॉ भोयर बोलत होते. बैठकीस आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, उपसचिव आबासाहेब कवळे, संचालक (प्राथमिक) गोसावी, सहसंचालक श्रीराम पानझाडे यांच्यासह विविध शिक्षक संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.



राज्यमंत्री डॉ पंकज भोयर म्हणाले, गेल्या काही काळापासून तांत्रिक अडचणींमुळे अनेक शिक्षकांचे वेतन रखडले आहे. अशा सर्व शिक्षकांचे वेतन तातडीने अदा करण्याची कार्यवाही पूर्ण करावी. याशिवाय, आदिवासी दुर्गम भागामध्ये कार्यरत असलेल्या शिक्षकांना 'एकस्तर वेतनश्रेणी' लागू करण्याबाबत सविस्तर अहवाल शासनाला सादर करावा, पूर्तता करण्यासाठी विशेष शिबिरे आयोजित केली जावीत. तसेच, संच मान्यतेशी संबंधित तक्रारी व अडचणींचे अशा सूचनाही त्यांनी शिक्षण आयुक्त कार्यालयाला दिल्या.

शिक्षकांच्या संच मान्यतेबाबत असलेल्या तक्रारी आणि प्रस्तावातील त्रुटी यांसारख्या समस्या सोडवण्यासाठी आता एकात्मिक उपाययोजना करावी. या त्रुटींची ऑनलाईन कामे कमी करण्यासाठी अभ्यासगटाच्या माध्यमातून आढावा घेण्यात यावा.

निवारण करण्यासाठी संचालक कार्यालयात एक स्वतंत्र आणि समर्पित कक्ष स्थापन करावा. अशाही सूचना राज्यमंत्री डॉ. भोयर यांनी दिल्या.

कनिष्ठ महाविद्यालयांमधील सोयीसुविधा आणि उपलब्ध शिक्षक संख्या यांचा समतोल राखून, प्रात्यक्षिक वर्गाची क्षमता पूर्वीप्रमाणे ठेवण्याचे निर्देश देत राज्यमंत्री डॉ भोयर म्हणाले, शिक्षकांना सध्या जनगणनेची कामे आणि बीएलओ म्हणून निवडणूक विषयक कामे करावी लागत आहेत. या कामांचे समन्वय साधत पुढील शैक्षणिक वर्षाच्या प्रशिक्षण कार्यक्रमाची अंमलबजावणी करावी. तसेच, शिक्षकांना अशैक्षणिक आणि ऑनलाईन कामे कमी करण्यासाठी अभ्यासगटाच्या माध्यमातून आढावा घेण्यात यावा.

खंडाळा येथे विवाहीतेची गळफास घेऊन आत्महत्या

समुद्रपूर : तालुक्यातील खंडाळा येथील विवाहिता अश्विनी रोषण तुमडाम वय २६ वर्ष हिने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना आज दि २८ एप्रिल चे सकाळी उघडकीस आली आहे सदर महिला उच्च प्राथमिक शाळा खंडाळा येथे पती सोबत रोज खिचडी शिजविणे व साप सफाइचे काम करीत होती आज दिनांक २८ एप्रिल चे रोजी पहाटे च्या सुमारास घरात गळफास घेऊन आत्महत्या केली .पती घराचे बांधकाम सुरु असल्याने दुसरा घरी झोपून होते तर सासु सासरे घराचे बाहेर झोपून होते सकाळी ते उठले असता त्यांना मृत्यक गाळफास घेऊन दिसली आत्महत्ये चे कारण अजून पर्यंत समजू शकले नसून घटनास्थळी समुद्रपूर पोलीसस्टेशन चे ठाणेदार खोंद्रेरेवतकर व पोलीस कर्मचारी उपस्थित होऊन तपास सुरू केला घटनास्थळी पोलीस उपविभागीय अधिकारी सुशीलकुमार नायक यांनी सुध्दा भेट दिली तिला तीन वर्षांचा मुलगा आहे पुढील तपास समुद्रपूर पोलीस करीत आहे.

वंदनीय राष्ट्रसंत तुकोजी महाराज ११७ वा जन्मोत्सव उत्सव रामदारा येथे संपन्न



तळेगाव : दिनांक २८ एप्रिल २०२६ रोज मंगळवारला रामदारासिरीं पुनर्वसन तळेगाव या ठिकाणी वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांची ११७ वा जन्मोत्सव कार्यक्रम संपन्न झाला या कार्यक्रमाकरिता ह.भ.प.परमेश्वरी दीदी शेलोटकर अनमोलरत्न पुरस्काप्राप्त श्री शेत्र गुरुकुंज मोझारी यांनी किर्तनरुपी सेवा दिली त्यांनी लहान मुलांना वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांचा जीवन परिचय दिला त्याचप्रमाणे सतीश दादा खरवडे यांनीआणि आष्टी तालुक्याचे सेवाधिकारी माननीय श्री तारेश दादा बोडखे यांनी आपले विचार मांडून वंदनीय महाराजांच्या कार्याचा गौरव केला या कार्यक्रमाकरिता रामदारा श्री येथील सरपंच सौ ज्योत्सनाताई खरवडे सतीश दादा खरवडे बामनरावजी पिंगळे ओंकार राव ठाकरे ज्ञानेश्वर राव बाबर प्रकाश भाऊ पोहकार विनोदराव कुटे विनोददादा भालेराव रमेशभाऊ बनकर राजीव बनकर कैलास जी महल्ले विपुलदादा चौधरी संजय भाऊ भुजाडे तसेच श्री गुरुदेव सेवा मंडळ रामदरा श्री येथील मोठ्या संख्येने सर्व ज्येष्ठ व लहान मंडळी व संपूर्ण गावातील उपस्थित होते या कार्यक्रमाकरिता गुरुदेव सेवा मंडळातील संपूर्ण लहान मुलांनसहसेवकांनी परिश्रम घेतले शेवटी सर्वांचे कौतुक व आभार आनंद भालेराव यांनी व्यक्त केले आणि राष्ट्र वंदना व जयघोष करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली

त्रिरत्न बुद्ध विहार गौळ येथे बुद्ध जंयतीचे आयोजन.!

गौळ : तथागतांच्या धम्माचे चक्र गतिमान करण्यासाठी भगवान बुद्धांच्या २५८९ व्या जयंतीनिमित्त बुद्ध पौर्णिमेला

त्रिरत्न बुद्ध विहार गौळ येथे गौतम बुद्ध यांच्या जंयतीचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळेस विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.पहाटे बुद्ध विहारातील गौतम बुद्धाच्या मुर्तीस वैशाख पौर्णिमेला

पुष्पहार अर्पण करण्यात येईल.

दुपारी ११ वाजता धम्मदेशना व पूजापाठ आयोजित केला आहे.

सायंकाळी सार्वजनिक भोजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून बौद्ध बांधवांनी धम्मदेशना पुजा पाठ कार्यक्रमास शुभ्र वस्त्र परिधान करून उपस्थित राहावे असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने राहुल मोडक, प्रजात कावंळे, अजय कांवळे, पणु लामसोंगे, भूषण थुल, रोहन मानकर, संजय कांबळे, सिद्धु वाळके ,सम्राट कांबळे, सिद्धांत थुल,जीवन दोडके यांनी केले आहे.

नाफेड अंतर्गत हरभरा खरेदी सुरू न झाल्याने उग्र आंदोलन बाळा जगताप

आर्वी : नाफेड अंतर्गत हरभरा खरेदी सुरू करण्यात आली होती ११३४ शेतकर्यांनी हरभरा विक्रीकरिता नोंदणी केली. त्यापैकी १९० लोकांचा शेतमाल नाफेड ने खरेदी केला ९४३ शेतकऱ्यांचा हरभरा खरेदी विना घरी ठेवून आहे.नाफेड ने नोंदणी झालेला सर्व हरभरा खरेदी न केल्यास उग्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा काँग्रेसचे नेते तथा प्रहार सोशल फोरमचे संस्थापक अध्यक्ष बाळा जगताप यांनी दिला आहे.

शेती उत्पादित मालाला खुल्या बाजारात अपेक्षित दर मिळत नसल्यामुळे तालुक्यातील शेतकरी आर्थिक संकटात सापडले खुल्या बाजारात कवडीमोल भावात शेतमाल विकावा लागला त्यातून पीक लागवडीपासून ती खाती येईपर्यंत झालेला खर्च निघालेला नाही कपाशी तूर व सोयाबीन या पिकाचे उत्पन्न नगण्य राहिल्यामुळे तालुक्यात अनेक शेतकऱ्यांनी रब्बी हंगामातील हरभरा या पिकाची पेरणी केली होती निसर्गाने साथ दिल्यामुळे हरभरा या पिकाचे समाधानकारक उत्पन्न झाले बाजारपेठेत हमीभावापेक्षा कमी दरात हरभरा खरेदी होत असल्याने शेतकऱ्यांनी नाफेड कडे हमीभावात हरभरा विकण्याकरिता नोंदणी केली आर्वी तालुक्यात ११३४ शेतकर्यांनी हरभरा विक्रीकरिता नोंदणी केली. त्यापैकी १९० लोकांचा शेतमाल नाफेड ने खरेदी केला ९४३ शेतकऱ्यांचा हरभरा खरेदी विना घरी ठेवून आहे. गेल्या दोन महिन्यापासून शेतकऱ्याच्या घरात विक्री विना हे पीक पडून आहे.

हरभरा विक्री मधून मिळणाऱ्या उत्पन्नावरच शेतीचा पुढील खर्च व शेतकऱ्यांच्या परिवाराकरिता लागणाऱ्या खर्चाला हातभार होईल अशी अपेक्षा बाळगत शेतकऱ्यांनी हरभऱ्याची पिक ना आपल्याला विकण्याकरिता राखून ठेवले.

अचानक पणे ना पडणे खरेदी बंद केली त्यामुळे शेतकरी अडचणीत आले.

नाफेड ने नोंदणी झालेला सर्व हरभरा येत्या आठ दिवसांमध्ये खरेदी करावा.खरेदी न केल्यास उग्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा काँग्रेसचे नेते तथा प्रहार सोशल फोरमचे संस्थापक अध्यक्ष बाळा जगताप यांनी दिला आहे.

युवकांनी चुकीच्या संगतीपासून दूर राहून आपल्या भविष्याकडे लक्ष केंद्रित केले पाहिजे.



हिंगणघाट : नी.सु.घटवाई विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय वडनेर येथे 'अमली पदार्थांचे दुष्परिणाम व आजची तरुणाई व्यसनाच्या विळख्यात' याविषयी मार्गदर्शन पर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

नेहमीच समाजजागृतीपर कार्यक्रम आयोजित करण्याचे प्रयोजन शाळेद्वारा होत असते. त्यात प्रशासनातील सर्व घटकांद्वारे जनजागृतीपर कार्यक्रम आयोजित केले जातात.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून विद्यालयाचे प्राचार्य रवींद्र गोडे तर प्रमुख अतिथी म्हणून उपविभागीय पोलीस अधिकारी सुशीलकुमार नायक,घनश्याम पाटील ठाणेदार पोलीस स्टेशन वडनेर,उप मुख्याध्यापक मंगेश चवडे मंचावर उपस्थित होते.

मंचावरील उपस्थित पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रम

उपविभागीय पोलीस अधिकारी सुशील कुमार नायक

सुरुवातीला पोलीस प्रशासनाद्वारे अमली पदार्थ जनजागृतीपर क्लिडिओ क्लिप दाखवण्यात आली. तद्नंतर उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी अमली पदार्थांचे शारीरिक,मानसिक, सामाजिक,आर्थिक दुष्परिणाम,प्रतिबंधात्मक उपाय,उगमस्थान,पुरवठा आणि त्यात आपल्या समाजाची काय भूमिका असावी,आजची तरुणाई या व्यसनाच्या विळख्यातून कशा पद्धतीने बाहेर निघेल यासाठी एक शिक्षक म्हणून आपली काय भूमिका असावी याविषयीचे मार्गदर्शन सर्वांना केले. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन मनोज तळवेकर यांनी केले तर कार्यक्रमाला उपस्थित सर्व शिक्षक, शिक्षिका,शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

'पॉश ॲक्ट' अंतर्गत समिती स्थापन न केल्यास कायदेशीर कारवाई – महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे

मुंबई : पॉश ॲक्टसंदर्भात राज्य शासन प्रभावी अंमलबजावणी करीत आहे. मात्र काही खासगी आस्थापनांमध्ये नियमांचे पालन होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे राज्यातील सर्व आस्थापनांमध्ये पॉश कायद्यानुसार महिलांच्या तक्रारींसाठी अंतर्गत समित्या स्थापन झाल्या आहेत का, याची तपासणी मोहीम राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ज्या आस्थापनांनी अंतर्गत समिती स्थापन केलेली नाही, त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, असे निर्देश महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले आहेत.



पॉश ॲक्ट २०१३ अंतर्गत राज्यातील सर्व आस्थापनांमध्ये महिलांच्या सुरक्षेसंदर्भात कायद्याची सक्तीने अंमलबजावणी करण्याबाबत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंत्री आदिती तटकरे बोलत होत्या. बैठकीस आयुक्त जगदीश मिनियार, अवर सचिव श्रीमती तीडके, सह आयुक्त राहूल मोरे (दृदृश्य प्रणालीद्वारे), मुंबई शहर जिल्हा महिला व बालविकास अधिकारी शोभा शेलार तसेच सामाजिक कार्यकर्ते महेंद्र वैसाणे आणि सिद्धी आंगणे उपस्थित होते.

मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, राज्यात शासकीय आणि खासगी अशा एकूण १,२३,७०० आस्थापनांमध्ये कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळ प्रतिबंध अधिनियम २०१३ अंतर्गत समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. ज्या आस्थापनांमध्ये या समित्या स्थापन झालेल्या नाहीत किंवा ज्या ठिकाणी त्या अस्तित्वात असूनही प्रभावीपणे कार्यरत नाहीत, अशा आस्थापनांवर कारवाई करण्यात यावी.

आयुक्त जगदीश मिनियार म्हणाले की, ज्या आस्थापनांमध्ये १० पेक्षा कमी कर्मचारी आहेत, तेथे महिलांना तक्रार नोंदविण्यासाठी स्थानिक समितीकडे जाता येते. राज्यातील ३६ जिल्ह्यांमध्ये जिल्हा अधिकारी यांच्या अध्यक्षतेत स्थानिक समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. राज्यभर मोहीम राबवून कायद्याची प्रभावी अंमलबजावणी न करणाऱ्या संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

महिलांसाठी ऑनलाईन तक्रार नोंदविण्यासाठी वेंध मोबाईल क्रमांक आणि ई-मेल आयडी आवश्यक आहे. https://shebox.wcd.gov.in या संकेतस्थळावर जाऊन 'रजिस्टर युवर कंप्लेंट' या पर्यायावर क्लिक करून आवश्यक माहिती भरून 'सबमीट' वर क्लिक केल्यास तक्रार नोंदवता येते.

गोंदिया शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील आधुनिक सुविधा कामांना वेग

वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक

मुंबई :– गोंदिया येथील वैद्यकीय महाविद्यालयाच्या उभारणीसाठी खर्चाच्या वाढीव मान्यतेसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे बैठक घेण्यात येणार असून, या दृष्टीने उच्चाधिकार समितीकडे प्रस्ताव सादर करण्यात यावा, असे निर्देश वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक झाली. यावेळी खासदार प्रफुल्ल पटेल, आमदार विनोद अग्रवाल, वैद्यकिय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव धीरज कुमार उपस्थित होते.

वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यावेळी म्हणाले, राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या निकषानुसार वैद्यकीय महाविद्यालय संकुलासाठी राज्य शासनाकडून वित्तीय व प्रशासकीय मान्यता देण्यात आल्या आहेत. सद्य:स्थितीत प्रशासकीय कार्यालयाच्या मुख्य इमारतीसह विविध विभागांचे काम प्रगतीपथावर आहे यातील सुविधा अत्याधुनिक असाव्यात यादृष्टीने कार्यवाही केली जात आहे.

खासदार प्रफुल्ल पटेल आणि आमदार विनोद अग्रवाल यांनी महाविद्यालयाची सुसज्जता आणि आधुनिकतेच्या दृष्टीने विविध सूचना केल्या. या वैद्यकीय महाविद्यालयाची कामे लवकर पूर्ण केली जावीत, असेही यावेळी सांगण्यात आले.

यावेळी बैठकीत वैद्यकीय महाविद्यालयाच्या बांधकामाच्या प्रगतीचा आढावा सादर करण्यात आला. या संकुलाच्या उभारणीमध्ये मुख्य प्रशासकीय संकुल, ऑडिटोरियम, ?नाटोमिक डिपार्टमेंट, शल्य चिकित्सा गृह, वॉर्ड , अतिदक्षता विभाग, एनआयसीयू यासह विविध कामे सुरू आहेत. सद्यस्थितीत यासाठी ७९० कोटी रुपये खर्च अपेक्षित असून विविध सुविधा आणि शल्य चिकित्सा गृहाची संख्या वाढविण्याच्या दृष्टीने सादर झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने खर्चात वाढ होत आहे.

सेलूतील यशवंत चौकात धुळीचे साम्राज्य: नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या ठेकेदाराला प्रशासनाचे अभय?

रस्त्याचे काम रडतखडत; ऐन उन्हाळ्यात थातूर मातुर पाणी मारणे सुरु असल्याने जनतेचा संताप

सेलू : सेलू शहराचीमुख्य केंद्रबिंदू असलेल्या यशवंत चौकात गेल्या दोन वर्षांपासून रस्त्याचे काम अतिशय कासवगतीने सुरू आहे. या रडतखडत चाललेल्या विकासकामामुळे सध्या या परिसरात धुळीचे प्रचंड साम्राज्य पसरले असून, नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. विशेष म्हणजे, ज्या उन्हाळ्यात धुळीचा त्रास अधिक होतो, त्याच काळात टँकरने थातूर मातूर पाणी मारणे सुरु असल्याने प्रशासनाच्या आणि ठेकेदाराच्या भूमिकेवर तीव्र संताप व्यक्त होत आहे.

यशवंत चौकातून दिवसभर अवजड वाहनांची आणि इतर वाहतुकीची मोठी वर्दळ असते. रस्ता उखडलेल्या अवस्थेत असल्याने वाहने जाताना धुळीचे लोट हवेत उडतात. यामुळे परिसरातील व्यापारी, पादचारी आणि दुचाकीस्वारांना, शालेय व महाविद्यालयीन विध्यार्थ्यांना श्वास घेणे कठीण झाले आहे. या धुळीमुळे अनेकांना



दम्यासारखे श्वसनाचे विकार जडले असून लहान मुले आणि वृद्धांच्या आरोग्यावर याचा विपरीत परिणाम होताना दिसत आहे.

केवळ आरोग्यच नव्हे, तर सुरक्षेचा प्रश्नही गंभीर बनला आहे. सायंकाळच्या वेळी हवेत उडणाऱ्या धुळीमुळे समोरचे वाहन दिसत नाही. संपूर्ण चौक अंधुकमय होत असल्याने या ठिकाणी भीषण अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. नागरिकांच्या जिवाशी खेळण्याचा अधिकार ठेकेदाराला दिला कुणी, असा जळजळीत सवाल आता विचारला जात आहे.

डप्रशासनाचा विचित्र कारभार: हिवाळ्यात दोन वेळा पाणी, उन्हाळ्यात मात्र थातूर मातूर ड

याच चौकात हिवाळ्याच्या दिवसात सकाळी आणि संध्याकाळी दोन वेळा टँकरद्वारे पाणी मारून धूळ शांत करण्याचा प्रयत्न केला जात होता. मात्र, आता जेव्हा सूर्याचा पारा ४६ अंशांच्या पार गेला आहे आणि उष्णतेमुळे धुळीचा त्रास अधिक वाढला आहे, तेव्हाच पाणी मारण्याचे काम अधिक जास्त प्रमाणात आवश्यकता आहे पण तसे होत नाही हा प्रश्न सामान्यांना पडला आहे. ठेकेदाराचा हा मनमानी कारभार आणि त्यावर प्रशासनाचे असलेले मूक संमतीचे लक्षण पाहून नागरिकांमध्ये आश्चर्य आणि संताप व्यक्त होत आहे. सदर रस्त्याच्या कामाबाबत आणि धुळीच्या त्रासाबाबत यापूर्वी अनेकदा प्रसार माध्यमातून प्रसिद्ध झाल्या आहेत. मात्र, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि संबंधित लोकप्रतिनिधी याकडे सपशेल दुर्लक्ष करत असल्याचे चित्र आहे.

प्रशासकीय यंत्रणा इतकी 'निगरगट्ट' झाली आहे का, की त्यांना जनतेच्या वेदना दिसत नाहीत? असा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे. 'रस्त्याचे काम कासवगतीने सुरू आहेच, पण किमान उडणारी धूळ थांबवण्यासाठी तात्काळ नियमित जास्त प्रमाणात पाणी मारण्याची व्यवस्था करावी. अन्यथा, होणाऱ्या परिणामांना प्रशासन आणि ठेकेदार जबाबदार राहतील,' असा इशारा संतप्त नागरिकांनी दिला आहे.आता तरी संबंधित बांधकाम विभाग आणि लोकप्रतिनिधी या गंभीर समस्येकडे लक्ष देऊन तातडीने उपाययोजना करणार की एखाद्या मोठ्या अपघाताची प्रतीक्षा करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा क्रीडा क्षेत्रासाठी मैलाचा दगड ठरणार –पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा

प्रतिनिधी/ दिलीप येवले

नागपूर : आपल्या राज्यामध्ये देशी खेळ प्रचंड लोकप्रिय आहेत. राज्यातील ग्रामीण व शहरी या दोन्ही विभागामध्ये कबड्डी हा खेळ खेळला जातो. त्यामुळेच महाराष्ट्राच्या गावा गावामध्ये या खेळाची लोकप्रियता प्रचंड असून ती दिवसेंदिवस वाढत आहे. जिल्ह्यात होणारी छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा ही क्रीडा क्षेत्रासाठी मैलाचा दगड ठरणार असल्याचे प्रतिपादन पालकमंत्री तथा स्पर्धा आयोजन समितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

प्रेस क्लब येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी नागपूर ग्रामीण कबड्डी असोसिएशनचे



अध्यक्ष संकेत बावनकुळे, जिल्हा क्रीडा अधिकारी पल्लवी धात्रक, मनपा क्रीडा अधिकारी पीयूष आंबुलकर आदी उपस्थित होते. ३० एप्रिल ते ४ मे या कालावधीत ही स्पर्धा होणार आहे. १६ पुरुष व १६ महिला असे एकूण ३२ संघ या स्पर्धेत सहभागी होणार आहेत. स्पर्धेचे आयोजन उपसंचालक कार्यालय, क्रीडा व युवक सेवा, नागपूर विभाग, नागपूर व ?मॅच्युअर असोसिएशन ऑफ कबड्डी तसेच नागपूर ग्रामीण कबड्डी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात येत आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते या स्पर्धेचे उद्घाटन होणार असून स्पर्धा कालावधी दरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी स्पर्धास्थळी भेट देणार असल्याचे पालकमंत्री श्री. बावनकुळे यावेळी म्हणाले.

छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्याचा मान तब्बल १९ वर्षांनी नागपूर जिल्ह्याला प्राप्त झालेला आहे. स्पर्धा उच्च दर्जाची व भव्य स्वरूपात आयोजित करण्यात येत आहे. नागपूर येथे आयोजित करण्यात येणारी ही राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा क्रीडाक्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे पालकमंत्री श्री. बावनकुळे यावेळी म्हणाले.

कारंजातील अंगणवाड्यांच्या विकासासाठी आमदार सुमित वानखेडे सरसावले; 'नगरोत्थान' मधून हक्काची इमारत मिळवून देण्याचे आश्वासन



कारंजा (घाडगे): कारंजा शहरातील अंगणवाड्यांच्या दुरवस्थेचा आणि मूलभूत सुविधांच्या अभावाचा प्रश्न आता कायमचा सुटण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत. शहरातील अनेक अंगणवाड्यांना स्वतःची इमारत नसल्याने त्या भाड्याच्या आणि अपुऱ्या सोयींच्या खोल्यांमध्ये भरत आहेत. या गंभीर प्रश्नाकडे 'कारंजा क्लब' तर्फे आमदार सुमितजी वानखेडे यांचे लक्ष वेधण्यात आले. यावर आमदारांनी अत्यंत सकारात्मक प्रतिसाद देत, नगर परिषद प्रशासनाच्या माध्यमातून 'नगरोत्थान' योजनेतून या अंगणवाड्यांचा कायापालट करण्याचे ठोस आश्वासन दिले आहे. ?कारंजा शहराचा विस्तार होत असताना शैक्षणिक सुविधांकडे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र होते. शहरातील अनेक प्रभागांमधील अंगणवाड्या गेल्या अनेक वर्षांपासून गळक्या, अंधाऱ्या आणि अत्यंत छोट्या भाड्याच्या खोल्यांमध्ये चालवल्या जात आहेत. तिथे ना मुलांसाठी खेळायला जागा आहे, ना स्वच्छ पिण्याचे पाणी. शौचालयांची तर मोठीच ओरड होती. चिमुकल्यांच्या आरोग्याचा आणि सुरक्षेचा प्रश्न यामुळे ऐरणीवर आला होता.

??शहरातील सामाजिक प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवणाऱ्या 'कारंजा क्लब'ने या विषयाचे गांभीर्य ओळखून सर्व माहिती संकलित केली. क्लबच्या पदाधिकाऱ्यांनी आमदार सुमित वानखेडे यांची भेट घेऊन त्यांना सविस्तर निवेदन सादर केले. यावेळी शहरातील

'कारंजा क्लब'च्या निवेदनाची घेतली गंभीर दखल; भाड्याच्या खोलीतील अंगणवाड्यांचा प्रश्न आता मार्गी लागणार

अंगणवाड्यांची विदारक स्थिती आमदारांसमोर मांडण्यात आली.

आमदार सुमित वानखेडेंची तात्काळ भूमिका

आमदार सुमित वानखेडे यांनी निवेदनाची दखल घेत असतानाच स्पष्ट केले की, चिमुकल्यांच्या प्राथमिक शिक्षणाचा पाया भक्कम असणे गरजेचे आहे. त्यांनी प्रशासनाला निर्देश दिले की, 'महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान' अंतर्गत शहरातील अंगणवाड्यांच्या नवीन इमारतीचे प्रस्ताव प्राधान्याने तयार करावेत. ज्या ठिकाणी शासकीय जागा उपलब्ध आहे, तिथे तातडीने सुसज्ज इमारती बांधण्याचे नियोजन करण्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

?आमदारांनी दिलेल्या या आश्वासनामुळे कारंजातील पालक आणि विशेषतः अंगणवाडी सेविकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. कित्येक वर्षांपासून प्रलंबित असलेला हा प्रश्न आमदार वानखेडे यांच्या माध्यमातून सुटणार असल्याने 'कारंजा क्लब'च्या बतीने त्यांचे आभार मानण्यात आले. या निर्णयामुळे कारंजाच्या शिरपेचात विकासाचा आणखी एक मानाचा तुरा रोवला जाणार आहे.

सरपंच पोटनिवडणुकीत भाजपाचा उमेदवार विजय



उब्दा, वाघेडा येथे भाजपा व अजित पवार गटाचा सदस्य विजय

तालुका प्रतिनिधी /अमोल झाडे

समुद्रपुर : तालुक्यातील दहेगाव येथील सरपंच पदाचया तर उब्दा, आणि वाघेडा येथील सदस्य पदाच्या निवडणुकीत निकाल घोषित झाला असून या निवडणुकीत दहेगाव येथे दहेगावात दिवंगत सरपंच बडोलांच्या जागी पोटनिवडणुकीत मुलगा झाला तर उब्दा, वाघेडा येथे भाजपा व अजित पवार गटाचा सदस्य निवडून आला. दहेगाव भाजपचे सरपंच अंकुश खुरपडे यांचे निधन झाल्याने येथील लोकनियुक्त सरपंचपदाची जागा खाली झाली होती.तर उब्दा, वाघेडा येथे एक एक ग्रामपंचायत सदस्यांची जागा रिक्त होती या तिन्ही ठिकाणी पोटनिवडणूक घेण्यात आली.दहेगांव येथे आमदार समिरभाऊ कुणावार यांच्या नेतृत्वात सरपंच पदासाठी निवडणूक लढविण्यात आली होती यावेळी दिवंगत सरपंच अंकुश खुरपडे यांचा मुलगा आदित्य खुरपडे यांना सरपंच पदासाठी उमेदवारी देण्यात आली. येथील जनतेने आमदार समिरभाऊ कुणावार यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून तसेच अंकुश खुरपडे यांनी केलेल्या विकास कामांमुळे नागरिकांना अंकुश खुरपडे यांचा मुलगा आदित्य खुरपडे यांना ४०५ मताचा आशिर्वाद दिला तर नामदेव मघराज यांना २०४ मते मिळाली तिसऱ्या क्रमांकावर विष्णू खुरपडे यांना १७८ मते मिळाली असून आदित्य खुरपडे यांचा १७४ इतक्या मोठ्या मताधिक्याने विजय झाला.वाघेडा ग्रामपंचायत सदस्य पोटनिवडणूक सुनिता महाकाळे यांना १५० मते मिळाली असून सुलोचनाशेरोडके यांना १३४ मते मिळाली याठिकाणी भाजपाचे सुनिता महाकाळे यांचा १६ मतांनी विजयी झाला.तर उब्दा येथे घेण्यात आलेल्या सदस्यपदीच्या पोटनिवडणूक मयुरी चौधरी यांना १२९ मते तर योगिता बगडे यांना ११२ मते मिळाली असून याठिकाणी अजित पवार गटाच्या मयुरी चौधरी यांनी १७ मतांनी विजयी संपादन केला आहे.हि संपुर्ण निवडणूक प्रक्रिया तहसीलदार कपिल हाटकर यांच्या मार्गदर्शनात पार पडली.

हिंगणघाटमध्ये क्रिकेटचा महाकुंभ सुरू

हिंगणघाट प्रीमियर लीग २०२६चा भव्य शुभारंभ

हिंगणघाट : हिंगणघाट शहरात बहुप्रतिक्षित हिंगणघाट प्रीमियर लीग २०२६ स्पर्धेचा शानदार शुभारंभझाला.ही स्पर्धा २९एप्रिल ते १० मे दरम्यान होणार आहे. या स्पर्धेत नामवंत संघ सहभागी होत आहे. वसंत विहार मैदानावर आयोजित ही स्पर्धा आता केवळ हिंगणघाटपुरती मर्यादित राहिली नसून संपूर्ण विदर्भात एक प्रतिष्ठित आणि लोकप्रिय क्रिकेट स्पर्धा म्हणून ओळखा निर्माण झाली आहे.

या भव्य क्रिकेट महोत्सवाचे आयोजन पेसिफिक क्रिकेट क्लब यांच्या वतीने करण्यात आले आहे. या उपक्रमामागे क्लबचे अध्यक्ष प्रशांत मोहता यांचे मोलाचे योगदान आहे. त्यांच्या अथक परिश्रम आणि समर्पणामुळे उत्कृष्ट दर्जाचे क्रिकेट मैदान उभे राहिले असून हिंगणघाटमध्ये क्रिकेटला नवी ऊर्जा आणि दिशा मिळाली आहे.

हिंगणघाट हे क्रिकेटसाठी आर्थापासूनच ओळखले जाणारे शहर असून आता ते युवा खेळाडूंसाठी एक सक्षम केंद्र बनले आहे. या लीगमध्ये विदर्भातील विविध भागांतील गुणवंत खेळाडू सहभागी होत असून अनेक खेळाडूंनी याचा व्यासपीठावरून विदर्भस्तरावर आपली छाप पाडली आहे.

या स्पर्धेची विशेष बाब म्हणजे ही व्हीसीए अफिलेटेड स्पर्धा आहे. त्यामुळे खेळाडूंच्या कामगिरीची नोंद विदर्भ क्रिकेट असोसिएशन कडे केली जाते, ज्यामुळे त्यांना पुढील क्रिकेट कारकिर्दीत मोठी संधी उपलब्ध होते.

एस एस एम विद्यालयाची शिष्यवृत्ती योजना परीक्षेत उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम.

हिंगणघाट: प्रोग्रेसिव एजुकेशन सोसायटी द्वारा संचालित एस. एस. एम. विद्यालय, चे राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना परीक्षेत सुयश.दरवर्षी शाळेतून विविध स्पर्धा परीक्षामध्ये अधिकाधिक विद्यार्थ्यांना प्रोत्साहीत करण्यात येते २०२५-२६ मध्ये राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना परीक्षेत शाळेतील ०३विद्यार्थी शिष्यवृत्ती पात्र झाले. कु. चारूश्री गणेश घुबडे, कु.श्रेया प्रशांत मोरे कु. श्रावणी स्वप्नील धारकर या विद्यार्थीनींनी घवघवीत यश प्राप्त करून निकालाची परंपरा कायम राखली आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष श्री. गो. गो. राठी उपाध्यक्ष श्री श्या भा भीमनवार सचिव श्री र गं धारकर तसेच शाळेचे मुख्याध्यापक श्री. रा. ता. कारवटकर उपमुख्याध्यापिका सौ.की.र.मद्दलवार पर्यवेक्षक श्री.ई.श. चंदनखेडे मार्गदर्शक शिक्षक श्री माशरकर श्री गौळकार सौ मडावी यांनी केल.यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे..यशस्वी विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापिका पर्यवेक्षक सर्व शिक्षकांना तसेच आई वडिलांना दिले.

श्रीगुरुदेव सेवा मंडळ, नागपूर तर्फे ग्रामजयंती निमित्त विविध क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्कार जाहीर

प्रतिनिधी/ दिलीप येवले

नागपूर - श्रीगुरुदेव सेवा मंडळ नागपूर च्यावतीने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ग्रामजयंती निमित्त विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा सन्मान म्हणून पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. राष्ट्रसंतांच्या विचारांचा प्रसार तसेच कला, साहित्य, सेवा, कृषी आणि पत्रकारिता क्षेत्रात विशेष योगदान देणाऱ्या मान्यवरांना गौरविण्यात येणार आहे. दि. ३० एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ६.०० वाजता. श्रीगुरुदेव सेवाश्रम नागपूर येथे होणाऱ्या कार्यक्रमात सन्मानचिन्ह व रोख पारितोषिक देऊन पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. जाहीर करण्यात आलेल्या पुरस्कारांमध्ये राष्ट्रसंत विचार प्रसार सेवा पुरस्कार (शहर विभाग) आकाश निस्तोने, नागपूर यांना, तर ग्रामीण विभागासाठी श्री पुरुषोत्तम बैसकार, यवतमाळ यांना प्रदान करण्यात येणार आहे. राष्ट्रसंत साहित्य विचार प्रसार सेवा पुरस्कार (संस्था –शहर विभाग) राष्ट्रसंत विचार साहित्य परिषद, चंद्रपूर यांना, तसेच संस्था –दुर्गम भाग विभागासाठी श्रीगुरुदेव व्यायाम शिक्षण व सेवा मंडळ, गडचिरोली यांना जाहीर केला आहे. पत्रकारिता क्षेत्रात देशभक्त वामनराव गावंडे स्मृती पत्रकार पुरस्कार संध्या राजूरकर (दैनिक बहुजन सौरभ –निवासी संपादक) यांना, तर पत्रकार श्याम लोहबरे स्मृती पुरस्कार अनिल उमाकांत फेकरीकर (मुख्य उपसंपादक तरुण भारत, नागपूर) यांना प्रदान करण्यात येणार आहे. संगीत क्षेत्रातील योगदानाबद्दल संगीतरत्न अन्नाजी माहुलकर स्मृती पुरस्कार प्रमोद पोकळे, बडनेरा (प्रयोगशील संगीतकार) यांना जाहीर करण्यात आला आहे. तसेच आदर्श ग्रामपंचायत पुरस्कार आदर्श ग्रामपंचायत कवठा (म्हसाळा), यांना देण्यात येणार आहे. सर्व पुरस्काराथींनी कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

अधिक माहितीसाठी मो. ८६०००२९६६० या क्रमांकावर संपर्क साधावा अशी माहिती दिलीप सुरकार कार्यकारी अध्यक्ष, व बंडोपंत बोडेकर उपाध्यक्ष, राष्ट्रसंत साहित्य अभ्यास मंडळ, नागपूर यांनी दिली आहे.

गौळ गावच्या रस्त्याची दुरवस्था ; रसस्यावरती डांबर, खडी गायब वाहनचालकांना होतोय त्रास

आमदार साहेब ,याही रस्त्यांवर लक्ष द्या संतप्त गावकऱ्यांची मागणी



गौळ : देवळी तालुक्यातील कोळोणा (चोरे) चौरस्त्यापासून गौळ गावाकडे जाणारा मुख्य रस्ता सध्या अत्यंत खराब झाला असून, या मार्गावरून प्रवास करणे नागरिकांसाठी मोठी अडचण ठरत आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी मोठे खड्डे पडलेले आहेत. अनेक ठिकाणी डांबर पूर्णपणे निघून जाऊन खडी उघडी पडली आहे, त्यामुळे वाहन चालवताना अपघाताचा धोका वाढला आहे.काही भागांमध्ये रस्ता पूर्णपणे उखडलेला असल्याने वाहनचालकांना खूप सावधपणे वाहन चालवावे लागते. हा रस्ता गौळ गावासाठी मुख्य संपर्क मार्ग असल्याने दररोज मोठ्या प्रमाणात वाहतूक या मार्गावरून होत असते, त्यामुळे या रस्त्याची सध्याची अवस्था अधिकच त्रासदायक ठरत आहे.या रस्त्याच्या दुरस्तीकरीता येथील नागरिकांनी आमदार, बांधकाम विभाग, तहसीलदार यांना निवेदने दिली असून एकही अधिकारी या रस्त्याची चौकशी करण्याकरीता आले नाहीत की कुठलीही हालचाल झाली नसल्यामुळे लोकप्रतिनिधी म्हणून आमदार साहेब या कडे लक्ष द्या. गावात पोस्ट कार्यालय,प्राथमिक आरोग्य केंद्र, सेतु कार्यालय, मिनि बँक तथा संत लोटांगण महाराज संस्थान, संत बाबाराव महाराज खराबे संस्थान असल्यामुळे येथे दरोरज काम काजाकरीती कर्मचारी ग्राहक तथा संस्थानात दर्शनासाठी भाविक येत असतात. मात्र, रस्त्याची ही बाईट अवस्था असल्यामुळे विद्यार्थ्यांसह,ग्राहकांना तथा देवळी येथे राजी, बेराजी रोजगारासाठी कंपनीमध्ये जाणाऱ्या कामगारांना, ,कर्मचाऱ्यांना व भाविकांना प्रवास करताना अडचणीचा सामना करावा लागत आहे. गौळ गावासाठी हाच मुख्य रस्ता अत्यंत महत्त्वाचा असून, त्याची ही दुरवस्था स्थानिक वाहतूक आणि पर्यटनासाठी मोठी समस्या बनली आहे. त्यामुळे या रस्त्याची तातडीने दुरुस्ती होणे आवश्यक आहे. चारही बाजूचे रस्ते खराब झाले असून आंजी दापोरी,अडेगाव,कोळोणा रस्त्यांवरून गौळ कडे येतांना कसरत करावी लागते त्यामुळे आमदार राजेश बकाणे यांनी या रस्त्याचा प्रश्न तातडीने मार्गी लावावा अशी नागरिकांची मागणी आहे.

मनपा अर्थसंकल्पाच्या मुखपृष्ठासाठी स्पर्धा; मोठ्या संख्येत सहभागी होण्याचे नागरिकांना आवाहन

प्रतिनिधी/ दिलीप येवले

नागपूर : नागपूर महानगरपालिकेच्या २०२६-२७ या वर्षासाठीच्या अर्थसंकल्प पुढील महिन्यात सादर होणार आहे. त्याच अनुषंगाने यावर्षी स्मार्ट, पर्यावरणपूरक, शाश्वत विकास व महिलांना केंद्रस्थानी ठेऊन तयार होणाऱ्या या अर्थसंकल्पाचे मुखपृष्ठ तयार करण्यासाठी स्पर्धा आयोजित केली आहे.

मा.महापौर श्रीमती निता ठाकरे, उपमहापौर श्रीमती लिला हाथीबेड, स्थायी समितीच्या सभापती श्रीमती शिवानी दाणी-वखरे, सत्तापक्ष नेते श्री. नरेंद्र (बाल्या) बोरकर यांच्या मार्गदर्शनात शहराच्या विकासासाठी कार्य केले जात आहे. अशात स्थायी समिती सभापती श्रीमती शिवानी दाणी-वखरे या पहिल्यांदाच हा अर्थसंकल्प सादर करणार आहेत. अर्थसंकल्पाचे मुखपृष्ठ करताना शहरातील नागरिकांच्या संकल्पनेतून मुखपृष्ठ तयार व्हावे, या हेतूने स्पर्धा स्थायी समिती सभापती श्रीमती शिवानी दाणी वखरे यांच्या संकल्पनेतून 'अर्थसंकल्पाचे मुखपृष्ठ तयार करण्याची' अभिनव स्पर्धा जाहीर करण्यात आली आहे. या स्पर्धेतील पहिल्या तीन विजेत्यांना अनुक्रमे ११ हजार, ७ हजार १०० व ५ हजार १०० रुपयांचे रोख पारितोषिक दिली जाणार आहेत.

कलावंतांनी मुखपृष्ठ ए ४ साईजमध्ये तयार करून जेपीईजी व सीडीआर फाईलमध्ये nmcbudget2026@gmail.com ई-मेल वर येत्या २ मेपर्यंत या प्रवेशिका पाठवाव्या, व मोठ्या संख्येत सहभागी होत स्पर्धा यशस्वी करावी असे आवाहन मनपातर्फे करण्यात आले आहे.



राज्यात केंद्रीय विद्यालयांसाठी मिळणार निःशुल्क सरकारी जागा

देवेंद्र फडणवीस सरकारचा निर्णय
महसूलमंत्री बावनकुळे यांचा पुढाकार
रत्नागिरीत नाचणे येथील सहा एकर जागा विनामूल्य

प्रतिनिधी/ दिलीप येवले

मुंबई : महाराष्ट्रातील ज्या जिल्ह्यांत केंद्रीय विद्यालय उभारण्यासाठी केंद्रीय विद्यालय संघटनकडून जागा मागितली असल्यास रीतसर मान्यता मिळालेल्या केंद्रीय विद्यालयांसाठी निशुल्क जागा देण्याचा निर्णय देवेंद्र फडणवीस सरकारने आज घेतला. विशेष म्हणजे, रत्नागिरी जिल्ह्यातील नाचणे येथे केंद्रीय विद्यालयासाठी याच निर्णयाने जागा देण्यात आली. आता राज्यात केंद्रीय विद्यालये उभारण्यासाठी गती येईल.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत आज हा निर्णय घेण्यात आला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेवरून महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रस्ताव दिला. त्यावरून, शासकीय भोगाधिकार मूल्यरहित व महसूल मुक्त किमतीने कब्जेहक्काने व भोगवटादार वर्ग दोन या धारणाधिकाराने हस्तांतरित करण्यास मान्यता देण्याचा निर्णय झाला आहे.

रत्नागिरी जिल्ह्यातील मौजे नाचणे येथील स.नंबर ९३ मधील एकूण १० हेक्टर ३० गुंठे क्षेत्रापैकी २ हेक्टर ५० गुंठे जमीन केंद्रीय विद्यालय उभारण्यासाठी निश्चित करण्यात आली आहे. ही जागा केंद्रीय विद्यालय संघटन, नवी दिल्ली यांना 'भोगवटादार वर्ग-२' या धारणाधिकाराने प्रदान करण्यात येईल. विशेष म्हणजे, ही जमीन प्रदान करताना कोणताही भोगाधिकार आकार किंवा महसूल शुल्क आकारले जाणार नाही, म्हणजेच ही जमीन पूर्णपणे महसूलमुक्त आणि विनामूल्य दिली जाणार आहे.

राज्यासाठी धोरणात्मक निर्णय

महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांमध्येही केंद्रीय विद्यालये उभारण्यासाठी राज्य सरकारने सकारात्मक पाऊल उचलले आहे. केंद्रीय विद्यालय संघटन, नवी दिल्ली यांनी ज्या-ज्या जिल्ह्यांमध्ये नवीन विद्यालये सुरू करण्यासाठी रितसर मान्यता दिली आहे किंवा भविष्यात देणार आहेत, अशा सर्व प्रस्तावांना आता गती मिळणार आहे.

अशा प्रस्तावांमध्ये शासकीय जमीन 'भोगवटादार वर्ग-२' या धारणाधिकाराने आणि विनामूल्य तत्त्वावर हस्तांतरित करण्यास मंत्रिमंडळाने तत्वतः मान्यता प्रदान केली आहे. यामुळे भविष्यात केंद्रीय विद्यालयांसाठी जमिनीचे प्रस्ताव शासन स्तरावर आल्यास, त्याला तातडीने मंजुरी मिळणे सोपे होणार आहे.

शैक्षणिक विकासाला गती

केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यां पाल्यांसह स्थानिक विद्यार्थ्यांसाठीही ही विद्यालये अत्यंत महत्त्वाची ठरतील. शासकीय जमिनींच्या या विशेष वाटपामुळे शैक्षणिक पायाभूत सुविधांच्या उभारणीतील मोठा अडथळा दूर झाला आहे.

सेलू तालुक्यात १ मे पासून डिजिटल जनगणनेला सुरुवात

नागरिकांना 'स्वयं-गणनेची' सुवर्णसंधी

सेलू : भारतीय जनगणनेचा कार्यक्रम जाहीर झाला असून, यंदाची जनगणना ऐतिहासिक ठरणार आहे. देशातील पहिली 'डिजिटल जनगणना' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या प्रक्रियेत नागरिकांना स्वतःची माहिती स्वतः भरण्याची विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

सेलू तालुक्यात १ मे ते १५ मे २०२६ या कालावधीत हा पहिला टप्पा राबविला जाणार असल्याची माहिती तहसीलदार कार्यालयाने प्रेसनोटद्वारे दिली आहे.

यातील ठळक वैशिष्ट्ये आणि प्रक्रिया खालील प्रमाणे आहे.

स्वयं-गणना कालावधी ही १ मे ते १५ मे २०२६ राहणार आहे.

यासाठी अधिकृत पोर्टल चा वापर करुन नागरिकांनी https://se.census.gov.in या संकेतस्थळावर जाऊन आपली माहिती भरायची आहे.

? पोर्टलवर नावनोंदणीसाठी कुटुंब प्रमुखाचे नाव आणि १० अंकी मोबाईल क्रमांक आवश्यक आहे. ही सुविधा विविध भाषांमध्ये उपलब्ध आहे.

माहिती यशस्वीरीत्या भरल्यानंतर कुटुंबाला एक 'स्वतंत्र ओळखपत्र क्रमांक' (ध्ऊ) मिळेल. हा क्रमांक सुरक्षित ठेवणे अत्यंत आवश्यक आहे.

?दुसऱ्या टप्प्यात प्रगणकांची भेट

जेव्हा प्रगणक प्रत्यक्ष घरभेटीसाठी येतील, तेव्हा नागरिकांनी त्यांना हा प्राप्त झालेला 'आयडी' द्यावा. प्रगणक तो पोर्टलवर अपलोड करतील, ज्यामुळे तुमची माहिती अधिकृतरीत्या जनगणनेत नोंदवली जाईल. या कामासाठी सेलू तालुक्यात २१३ प्रगणक, ३५ पर्यवेक्षक आणि ३ फील्ड ट्रेनर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

यंदाची गणना पूर्णपणे डिजिटल असून विशेष ॲप्लिकेशनद्वारे घराची स्थिती, पिण्याचे पाणी, वीज, स्वच्छता आणि मालमत्ता याबद्दलची सखोल माहिती संकलित केली जाणार आहे. नागरिकांनी भरलेली सर्व वैयक्तिक माहिती पूर्णपणे गोपनीय आणि सुरक्षित राहणार असल्याची ग्वाही प्रशासनाने दिली आहे.

सेलु ?तहसीलदार डॉ. शकुंतला पाराजे यांनी आवाहन करीत सांगितले आहे की,

'जनगणना हे एक राष्ट्रीय कार्य आहे. १५ वर्षांनंतर होणाऱ्या या प्रक्रियेत सेलू तालुक्यातील नागरिकांनी स्वतः उत्स्फूर्त होवून सहभाग नोंदवावा.

दि.१ ते १५ मे २०२६ दरम्यान घरबसल्या स्वयं-गणना पोर्टलचा लाभ घ्यावा आणि त्यानंतर प्रत्यक्ष सर्वेक्षणासाठी येणाऱ्या प्रगणकांना सहकार्य करावे,' असे आवाहन सेलू तालुका प्रशासनातर्फे नागरिकांना करण्यात आले आहे.

२०११ पूर्वीची सरकारी जागेवरील निवासी अतिक्रमणे होणार नियमित

५०० चौरस फुटापर्यंतच्या घरांसाठी सुविधा होणार उपलब्ध : तहसीलदार समर्थ क्षिरसागर

प्रतिनिधी/ योगेश काबंळे

गौळ (वार्ताहर) शासकीय जमिनीवरील दिनांक १ जानेवारी २०११ पूर्वीची निवासी अतिक्रमणे नियमित (नियमानुकूल) करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. ५०० चौरस फुटापर्यंतच्या घरांसाठी हो सुविधा उपलब्धं करून देण्यात आली असूल ग्रामविकास व महसूल विभागामार्फत अर्ज स्विकारले जाऊन कागदपत्राची पडताळणी करून हे नियमानुकुल केले जाईल.

राज्यातील गरीब व गरजू कुटुंबाच्या निवासस्थानाचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावण्यासाठी महाराष्ट्र शासनाने अत्यंत महत्वपूर्ण निर्णय घेतला असून महसूल व वनविभागाने निर्गमित केलेल्या दिनांक २५ मार्च २०२६ च्या शासन निर्णयान्वये बृहमुंबई वगळता इतर सर्व जिल्हांमधील शासकीय जमिनीवरील १ जानेवारी २०११ रोजी किंवा त्यापूर्वीची निवासी अतिक्रमणे काही विशिष्ट अटी व शर्तीवर नियमित करण्यात येणार आहे. ५०० चौरस फुटापर्यंतचे निवासी अतिक्रमणे विनामूल्य नियमित केले जाईल. ५०० ते १५०० चौरस फुटापर्यंतच्या क्षेत्रासाठी पहिल्या ५०० चौरस फुटानंतरच्या अतिरिक्त क्षेत्रावर प्रचलित बाजारमूल्याच्या १० टक्के रक्कम आकारली जाईल. १५०० चौरस फुटांपेक्षा जास्त असलेले अतिक्रमण या योजनेअंतर्गत नियमित केले जाणार नाही. या प्रक्रियेसाठी जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी, नगरपालिका स्तरावर उपविभागीय अधिकारी आणि ग्रामिण भागात तहसीलदार यांच्या अध्यक्षतेत विशेष समित्या गठित करण्यात आल्या आहेत.

अर्जदाराने अर्ज केल्यानंतर ९० दिवसाच्या आत निर्णय घेणे या समित्यांना बंधनकारक असेल. याशिवाय नदीपात्र, नाले, सार्वजनिक रस्ते, वनजमिन, धोकादायक क्षेत्रे आणि गायरान जमिनीवरील अतिक्रमणे या धोरणांतर्गत नियमित केली जाणार नाहीत.

शासन निर्णयानुसार १५ एप्रिल २०२६ ते १ मे २०२६ या कालावधीमध्ये शासकीय जमिनीवरील अतिक्रमण निवासी प्रयोजनार्थ यादी तयार करण्यात येणार असून दिनांक ०१ मे २०२६ रोजी ग्रामसभेत यादीचे वाचन करण्यात येणार असून दिनांक ०१ में २०२६ ते १५ में २०२६ या कालावधीत यादी अंतिम करणेबाबत सूचना/अर्ज/विनंती याबाबत कार्यवाही पूर्ण करण्यात येईल. अर्ज प्राप्त झाल्याचे दिनांकापासून २१ दिवसाच्या आत प्राप्तं अर्ज/प्रस्तावावर समितीव्दारे निर्णय घेण्यात येईल.

तरी ग्रामीण भागात शासकीय अतिक्रमित जागेवर रहिवासी असलेल्या नागरिकांनी ग्रामपंचायत अधिकारी यांच्याकडे शक्य तेवढ्या लवकर अर्ज करावा, अर्ज न करणा-या व्यक्ती तसेच इतर अपात्र व्यक्ती संस्था यांची अतिक्रमणे त्यानंतर निष्कासित करण्यासाठी पात्र राहणार असल्याने नागरिकांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन तहसीलदार समर्थ क्षीरसागर यांनी केले आहे.

विनयभंग करून महिलेला जीवे मारण्याची धमकी

वर्धा : दारूविक्रेत्याच्या पत्नीचा विनयभंग करून शिवीगाळ करीत जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना शहरातील रामनगर जैन मंदिर परिसरात घडली. या प्रकरणी तिघांविरुद्ध रामनगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. रितीक पाल रा. कंजर मोहल्ला, लालू सोनी रा. भामटीपुरा आणि तुषार यादव उर्फ चुचू रा. भामटीपुरा अशी या प्रकरणातील आरोपींची नावे आहे. संबंधित तिघांनी पीडित महिलेला तिच्या पतीने खरेदी केलेल्या एमडी आणि व्याजाच्या पैशाची मागणी केली. आरोपी इतक्यावर थांबले नाही तर त्यांनी महिलेचा विनयभंग करून शिवीगाळ करीत जीवे मारण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत नमुद असल्याचे रामनगर पोलिसांनी सांगितले.

अमली पदार्थाचे सेवन करणार्या २ दोघांना बेड्या

आर्वी : शहरातील गोकुलधाम ले-आऊट परिसरात काही व्यक्ती अमली पदार्थाचे सेवन करीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तुषार तळवेकर (वय २०) रा. शिवाजी वॉर्ड शितला माता मंदिराजवळ आर्वी आणि मोहम्मद जमशेद मोहम्मद आहाद (वय २०) रा. नेताजी वॉर्ड आर्वी यांना चिलमने गांजा ओढताना रंगेहात पकडले. या प्रकरणी आर्वी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दहेगाव (मिस्कीन) येथील अल्पवयीन मुलीचा बालविवाह प्रशासनाच्या तत्परतेने थांबविला



वर्धा : दहेगाव (मिस्कीन) गावातील अल्पवयीन मुलीचा होणारा बालविवाह प्रशासनाच्या सतर्कतेमुळे व तातडीच्या हस्तक्षेपामुळे यशस्वीरित्या थांबविण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दहेगाव येथील अल्पवयीन बालिकेचा विवाहदिनांक २९.०४.२०२६ रोजी वर्धा येथील युवकासोबत ठरविण्यात आला होता. याबाबतची गोपनीय माहिती दिनांक. २७.०४.२०२६ रोजी चाईल्ड हेल्पलाईन १०९८ या टोल फ्री क्रमांकावर प्राप्त झाल्यानंतर मा. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी मा. तृप्ती चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली तातडीने पथक गठीत करून प्रतिबंधात्मक कार्यवाही करिता तत्काळ घटनास्थळी पाठविण्यात आले. सदर पथकामध्ये महिला व बाल विकास विभाग, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, चाईल्ड हेल्प लाईन, पोलीस विभाग तसेच स्थानिक प्रशासन यांचा समावेश होता. महिला व बाल विकास विभागाच्या मार्गदर्शनाखाली अंगणवाडी सेविका तथा सहाय्यक बालविवाह प्रतिबंधक अधिकारी श्रीमती जोत्सना बोरकुटे यांनी पालकांकडून बालविवाह न करण्याबाबतचा जबाबनामा घेतला.

यावेळी संरक्षण अधिकारी वैभव राउतराय, चाईल्ड हेल्प लाईनचे प्रकल्प समन्वयक आशिष मोडक, पोलीस स्टेशन सावंगी येथील पोलीस कर्मचारी संजय पटले व राहुल नागपुरे, अंगणवाडी सेविका सुमन कन्नाके, पोलीस पाटील आशिष मिस्कीन तसेच ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्टचे संतोष डोणे, मधुरी थूल व वैभव भांदककर, ग्रामपंचायत कर्मचारी अमोल वानखेडे उपस्थित होते.

कुटुंबियांसोबत संवाद साधताना बालिकेचे वडील नसल्यामुळे व मुलीबद्दल असुरक्षिततेची भावना असल्यामुळे तिचा लवकर विवाह करण्याचा निर्णय घेतल्याचे चर्चेत स्पष्ट झाले. यावेळी चाईल्ड हेल्प लाईन वर्धाचे प्रकल्प समन्वयक आशिष मोडक यांनी कुटुंबियांचे समुपदेशन करून बालविवाहाचे दुष्परिणाम तसेच कायदेशीर परिणाम याबाबत सविस्तर माहिती दिली. तसेच बालविवाह प्रतिबंधक कायदा, २००६ अंतर्गत बालविवाह हा दंडनीय गुन्हा असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

प्रशासनाच्या समजावणीमुळे कुटुंबीयांनी विवाह थांबविण्यास सहमती दर्शविली. यानंतर बालिकेच्या शिक्षण व सुरक्षिततेस प्राधान्य देण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच बालिकेला बाल कल्याण समिती, वर्धा येथे हजर करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून पुढील कार्यवाही बाल कल्याण समितीमार्फत करण्यात येणार आहे.

सदर कार्यवाही जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, वर्धा मा. तृप्ती चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा बाल संरक्षण अधिकारी महेश कामडी, सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज वाघोडे, संरक्षण अधिकारी वैभव राउतराय, चाईल्ड हेल्प लाईनचे प्रकल्प समन्वयक आशिष मोडक, ग्रामपंचायत दहेगाव (मि.) ग्रामपंचायत अधिकारी ज्ञानेश्वर गंगावणे यांच्या समन्वयाने यशस्वीरित्या पार पडली.

बालविवाह प्रतिबंधक अधिनियम, २००६ नुसार अशा प्रकरणांमध्ये बालिका व महिलांवर कारवाई केली जात नाही, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. आईने मुलीचे भविष्य घडविण्याकरिता प्रयत्न करावे, बालविवाहमुळे अल्पवयात मातृत्व लादले जाते, शारीरिक, मानसिक त्रासाला पुढे जाव लागते, मुलींना शिक्षण व स्वावलंबनाची संधी देणे आवश्यक आहे. अशा घटना आढळल्यास महिला व बाल विकास विभागाच्या चाईल्ड हेल्प लाईन १०९८ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी मा. तृप्ती चव्हाण यांनी केले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सहकार सेल विदर्भ विभाग तर्फे नगर परिषद नवनिर्वाचित सभापती व नगरसेवकांचा सत्कार









वर्धा : क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती निमित्त विविध कार्यक्रम संपन्न त्याचप्रमाणे विदर्भस्तरीय फिजियोथेरेपी आरोग्य कॅम्प संपन्न झाला.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सहकार सेल विभाग सेलचे मा. रामदासजी मोरे, प्रदेशाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व कार्यक्रमाचे उ?द्घाटक मा. संतोषजी ठाकूर, माजी नगराध्यक्ष नगरपरिषद वर्धा व कार्यक्रमाचे अध्यक्ष त्याचप्रमाणे मा. नेहा आशिष आकरे, महिला बाल कल्याण सभापती, नगर परिषद, वर्धा यांच्या उपस्थितीत प्रथम क्रांतीसूर्य महात्मा जोतिबा फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती निमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले. विशेष म्हणजे नगर परिषद, नवनिर्वाचित सभापती व नगर सेवक यांचा सत्कार सोहळा मा. संतोष ठाकूर, माजी नगराध्यक्ष व मा. नेहा आशिष आकरे, महिला बालकल्याण सभापती नगर परिषद वर्धा यांचे चेतना फिजियोथेरपी कॉलेज च्या विद्यार्थ्यांतर्फे सत्कार करण्यात आला. उद्घाटन प्रसंगी मा. बालाजी शेळके यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सहकार सेलचे विचार, मा. प्रफुल्ल गुल्हाणे कार्याध्यक्ष सहकार सेल विदर्भ विभाग राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सहकार सेल यांनी प्रस्तावनागध्ये सहकार सेल व पक्षाची भूमिका त्याचप्रमाणे चेतना फिजियोथेरेपी कॉलेजमध्ये विदर्भस्तरीय फिजियोथेरेपी आरोग्य कॅम्प नागरिकांसाठी फी मध्ये सुविधा उपलब्ध करून दिली. त्याबद्दल त्यांनी आपले विचार व्यक्त केले आणि त्याचप्रमाणे आपण नागरिकांना जास्तीत जास्त सुविधा कसे देता येईल याविषयी मार्गदर्शन केले. मा. शरयूताई वांदिले सभापती पंचायत समिती, वर्धा महिलांना एकत्रित करणे व महिलांना सक्षम बनवणे याबद्दल पक्षाची भूमिका समजून सांगितली मा. विभाताई दाते महिला प्रदेश सचिव राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महिलांसाठी जास्तीत जास्त कार्यक्रम आयोजित करण्यात यावे आणि गावामध्ये महिलांचे संघटन मजबूत झाले पाहिजे याबद्दलचे पक्षाची भूमिका त्यांनी समजून सांगितले. मा. नेहा आशिष आकरे, सभापती महिला बाल कल्याण, नगर परषिद वर्धा यांनी आपल्या विचारात मला निवडून दिल्याबद्दल सर्व नागरिकांचे व कार्यकर्त्यांचे आभार मांडले. महिला बाल कल्याण सभापती पद मिळाल्यामुळे आपल्या सर्वांचे प्रश्न सोडविण्यात मी प्रयत्न करेल असे विचार मांडले. मा. संतोषभाऊ ठाकूर यांनी आपले अध्यक्षीय भाषणात मी सात वेळा नगरसेवक व नगराध्यक्ष आपल्या सर्व नागरिकांचे तसेच पक्षाचे कार्यकर्त्यांचे आभार मानले तसेच पक्षाची भूमिका व सर्व नागरिकांचे तसेच पक्षाचे कार्यकर्त्यांचे आभार मानले, पक्षाची भूमिका व जास्तीत पक्षाचे नगरसेवक कशी येतील याबद्दल त्यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. तसेच मंचावर उपस्थित मंगला भंडारी, महिला सरचिटणीस राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सोनल प्रदिप गिरडकर, मा. प्रदिपभाऊ गिरडकर जिल्हा उपाध्यक्ष, मयुर डफरे, युवक अध्यक्ष राष्ट्रीय काँग्रेस पार्टी, मा. देवीलालजी जयस्वाल, अध्यक्ष व्यापारी सेल, गाएतानी काँगेस पार्टी मोटर गाय किसान सेन्न गालताती काँगेस पार्टी आदी उपस्थित होते.

रोजगार कौशल्य साध्य करण्यासाठी यशवंत महाविद्यालयातील संगीत विभागाच्या विद्यार्थ्यांची वर्धा रेडिओला शैक्षणिक भेट



वर्धा : यशवंत महाविद्यालय वर्धा येथील संगीत विभागाचे विद्यार्थ्यांची रेडिओ वर्धा ९०.८इश येथे संगीत विभागाची शैक्षणिक भेट उत्साहात पार पडली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गिरीश ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली कौशल्य विकासा अंतर्गत विद्यार्थ्यांना रेडिओ संदर्भात रोजगाराच्या विविध संधी बद्दल माहिती , प्रसारणाची प्रत्यक्ष माहिती मिळवने आणि संगीत क्षेत्रातील व्यावहारिक ज्ञान वाढवणे हा होता. या उद्देशाने ही भेट आयोजित करण्यात आली होती.

यावेळी विद्यार्थ्यांनी स्टुडिओ, रेकॉर्डिंग रूम, तसेच प्रसारण प्रक्रियेची सविस्तर माहिती घेतली. रेडिओ वर्धाचे मॅनेजिंग डायरेक्टर अजय तीगावकर यांनी तसेच आरजे सुहास इंगळे, शकेब शेख या सर्व तज्ञ लोकांनी ध्वनिमुद्रण तंत्रज्ञान, कार्यक्रम नियोजन, निवेदन शैली आणि संगीत सादरीकरण याबाबत मार्गदर्शन केले. तसेच यशवंत महाविद्यालयाचे विद्यार्थी विवेक नारंगे हे तिथे आरजे म्हणून काम करतात. या शैक्षणिक क्षेत्रभेटीचे आयोजन संगीत विभागातील डॉ. निकिता निर्मळ यांनी केले.

या भेटीमुळे विद्यार्थ्यांमध्ये संगीत आणि प्रसारमाध्यम क्षेत्राबद्दल अधिक उत्सुकता निर्माण झाली असून, भविष्यात करिअरच्या नव्या संधींबाबत त्यांना दिशा मिळावी. या क्षेत्रभेटीत डॉ. रसिका करंडे संगीत विभागातील विद्यार्थ्यांमध्ये कु. रीता खोडे , कु.दिव्या किन्हेकर , कु. प्रियंका द्विवेदी, कु. गायत्री बावनकर,कलश प्रधान, कु. सलोनी देवतळे, कु.अनुष्का भानसे , कु. लीना खडसे, प्रमोद तराळे, कु. अनुष्का चुटे, कु.अभिलाषा तरवटकर, कु. अमिषा राऊत, सुरज गिरी, समीर मसराम मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव मिळाला व रेडिओ वर्धा यांचे कामकाज कसे चालते हे प्रत्यक्ष पाहायला मिळाले एकूणच ही भेट विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकास उपक्रमामध्ये उपयुक्त ठरली.

या उपक्रमाचे कौतुक करत, अशा शैक्षणिक भेटी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण असल्याचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गिरीश ठाकरे यांनी सांगितले.